दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम
रविवार पुरवणी १२ मे २०२४

# एक मतही बहुमूल्य !



जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई
संपर्क क्रमांक :
९६६४५५९७८०

निवडणुकीचा तिसरा टप्पाही पार पडला. चौथा टप्पा १३ मेला पार पडल्यानंतर पाचव्या टप्यात २० मेला राज्यातील मुंबई-ठाणे या प्रमुख शहरांसह कल्याण, भिवंडी. पालघर, नाशिक, दिंडोरी आणि धुळे या ठिकाणच्या निवडणूकाही पार पडणार आहेत.

सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने आणि शाळा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सुट्या पडल्याने शहरांतील अनेक जण सहकुटुंब आपल्या गावी केले आहेत. 'माझ्या एका मताने काय फरक पडणार आहे' या विचाराने ही मंडळी केवळ मतदान करण्यासाठी शहरात परततील असे खचितच घडू शकते. दोन्ही जिल्ह्यांतून गावी गेलेल्यांची एकूण संख्या पाहता ती लाखांच्या घरात असल्याने या संख्येमुळे मतदानाच्या टक्केवारीवर निश्चितच फरक पडणार आहे. या मंडळींना मतदानाचे महत्व लक्षात आणून देण्याचे कार्य शेजारी पाजारी राहणाऱ्या मंडळींना आणि ज्या गावी ही मंडळी गेली आहेत तेथील ग्रामस्थांना करावे लागणार आहे.

मतदानाचे महत्व लक्षात घेऊन आपण मतदान करून आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडणारच आहोत त्याचसोबत मतदानापासून वंचित राहू पाहणाऱ्यांना मतदानास प्रवृत्त करण्याचे कामही आपले कर्तव्यच आहे असे समजून गावी गेलेल्या आपल्या शेजाऱ्यांना संपर्क करून त्यांना मतदान करण्यासाठी बोलवूया. ज्या गावी ही मंडळी गेली आहेत तेथे शेजारी राहणाऱ्या ग्रामस्थांसह स्थानिक ग्रामपंचायतीतील प्रमुख मंडळींनी शहरातून सुट्टी घालवण्यासाठी आलेल्या मुंबई-ठाणेकरांना मतदान करण्यासाठी आपापल्या शहरांत जाण्यासाठी आग्रह करूया. लोकप्रतिनिधींच्या कामाबद्दल आपला रोष आपण वर्षभर प्रकट करतच असतो मात्र त्यांना अद्दल घडवण्याची आणि योग्य लोकप्रतिनिधी निवडण्याची संधी आपल्याला पाच वर्षांतून एकदा मिळते ती दवडता कामा नये.

गेल्या काही वर्षांत या दोन्ही शहरांतील अनेक मंडळी आपली शहरातील घरे विकून अथवा भाड्याने देऊन अंबरनाथ, बदलापूर, वांगणी यांसारख्या ठिकाणी स्थलांतरित झाली आहेत; मात्र त्यांचे नाव अद्यापही शहरातील त्यांच्या घरांच्या पत्यावरील मतदार याद्यांमध्ये आहे अशा मंडळींना मतदानासाठी वेळ काढून बोलावण्याचे कामही शेजारी राहणाऱ्या मंडळींनी करावे. शहराबाहेर गेलेली ही सर्वच मंडळी मतदानासाठी एव्हढ्या लांबून येतील असेही नाही; मात्र यातील काहीजण तरी आपण केलेल्या आग्रहामुळे लाजेखातर का होईना शहरात मतदान करण्यासाठी नक्कीच येतील.

याचसोबत आपल्या शेजारी राहणाऱ्या मंडळींपैकी कोणी मतदानाच्या दिवशी सहलीचे नियोजन करत असेल, तर अशांचेही प्रबोधन करून त्यांचे नियोजन हाणून पाडण्याचे दायित्व आपण घेऊया. प्रमुख शहरांतील निवडणूका अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जातात बऱ्याचदा येथील निकालांवर राज्यातील पर्यायाने देशातील जनमताचा कौल लक्षात घेतला जातो त्यामुळे या ठिकाणची टक्केवारी वाढवणे राजकीय पक्षांसाठी जिकरीचे असते.

शिवाय शहरातील मतदान केंद्रे ही बऱ्याचदा घरापासून एक ते दीड किलोमीटरच्या अंतरातच असतात त्यामुळे ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात मतदान अधिक होणे अपेक्षित असते; मात्र दुर्दैवाने तसे घडत नाही. 'माझ्या एका मताने काय फरक पडणार आहे' ही मानसिकता लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे.

२००४ च्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीत उमेदवार ए. आर. कृष्णमूर्ती यांना ४०७५१ मते पडली, तर त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवाराला ४०७५२ मते पडली, परिणामी ए. आर. कृष्णमूर्ती यांचा केवळ एका मताने पराभव झाला. २००९ च्या राजस्थान राज्याच्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री पदाचे दावेदार असलेले सी.पी. जोशी यांना ६२२१५ मते पडली, तर त्यांच्या विरोधात उभे राहिलेल्या कल्याण सिंह चौहान यांना ६२२१६ मते पडली. अटीतटीच्या या लढतीमुळे सी.पी. जोशी यांना आमदारकीसह मुख्यमंत्री पदावरही पाणी सोडावे लागले.

१९९९ साली अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना विरोधी पक्षांनी विद्यमान सरकारविरोधात अविश्वास ठराव आणला. वाजपेयी या ठरावाला हिमतीने सामोरे गेले. या ठरावावर झालेल्या मतदानात अटल बिहारी वाजपेयी यांच्या बाजूने २६९ मते पडली, तर विरोधात २७० मते पडली. केवळ एका मताच्या फरकामुळे वाजपेयी सरकार १३ दिवसांतच कोसळले.

एका मताचे महत्व सांगणारी अशी अनेक उदाहरणे जगाच्या राजकारणात होऊन गेली आहेत त्यामुळे एक मताने काय फरक पडणार आहे असे म्हणणेच मुळात चुकीचे आहे. लोकांच्या मनात लोकशाही किती रुजली आहे हे निवडणुकांतील मतदानाच्या टक्केवारीवरून दिसून येते. विश्वातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून बिरुद मिरवणाऱ्या भारतातील मतदारांची मतदानाविषयीची नाराजी निंदनीय आहे, ही टक्केवारी वाढवण्यासाठी आज सर्वांनी मिळून प्रयत्न करणे आवश्यक आहे.

## दैनिक सिंधुदुर्ग समाचार

**दैनिक सिंधुदुर्ग समाचारने कोकणातील मुलांना या उन्हाळी सुट्टीमध्ये लिहीत होण्यासाठी एक नवीन उपक्रम हाती घेतला आहे. यामध्ये कोकणातील विविध शाळांतील मुलांनी केलेले लिखाण प्रसिद्ध होणार आहे.**

**प्रामुख्याने या "बालमैफिल" च्या पुरवणीची सर्व जबाबदारी दापोली तालुक्यातील चंद्रनगर येथील शाळेच्या विद्यार्थ्यांनी घेतली आहे. यामध्ये मुलांना लिखाण करण्यासाठी मुलांना प्रोत्साहित करण्यापासून ते पुरवणीची सर्व जबाबदारी या शालेय विद्यार्थ्यांनी घेतली आहे.**

## मनाच्या हिंदोळ्यावर



बाबू घाडीगांवकर,
त्रिंबक, ता.मालवण.
मो. ९४२१७९५९५५.

# सुट्टी तेव्हाची, आणि....

आमच्या बालपणीचा काळच निराळा होता. मे महिन्याची सुट्टी आम्हाला खुणावत असली तरी एक तारखेला 'निकाल' काय लागेल यावरच पुढची सुट्टी किती आनंदात जाईल हे अवलंबून असायचे. आताच्यासारखी 'सर्वसाधारण' श्रेणी पद्धती तेव्हा नव्हती. त्यामुळे परीक्षेत कितव्या नंबराने उत्तीर्ण झालो यावर मग त्या दिवशीचे आमचे घरातील आगमन व 'आगतस्वागत' कसे होणार हे अवलंबून असायचे. मला आठवते, मी सातवीतून आठवीत जाताना तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झालो त्या दिवशी मला घराचे दार बंद झाले होते. मात्र मला आश्चर्य वाटायचे, माझ्या वर्गातील अनेकजण तर 'पीआर' झाले तरी त्यांना त्यांचा बापूस काही बोलायचा नाही. गुणपत्रक हळूच आव्शीच्या हातात कोंबून ते म्हशी घेऊन मळ्यात पसार व्हायचे आणि तिसरा क्रमांक पटकावूनही माझी घरी 'धडगत' नसायची. किती बरे हा विरोधाभास! बाबा दर इयत्तेच्या निकालादिवशी बजावायचा, ' तुका फुडे न्हेणारो कोण नायहा. तुझो तुकाच अभ्यास करूचो हा नि फुडे जाव्चा हा!' मला बाबाच्या भावना तेव्हाही कळायच्या. पण परीक्षा म्हटली की थोडेफार 'उन्नीस-बीस' होणारच ना? पण हे बाबाला पटायचे नाही.

मे महिन्यात तसा आमचा गाव मुलांनी भरून जायचा. मुंबईतील चुलत्यांची मुलेही या सुट्टीत गावी यायची. या दिवसांत तळ्यावर तर दिवसभर माणसांची जत्राच भरायची. आजूबाजूच्या काही गावांतून पाण्याचा 'ठणठणाट' असताना आमच्या घराजवळचे तळे मात्र ओसंडून वाहत असायचे. गावातली सारी मुले दिवसभर तळ्यात डुंबत असायची. सोबतीस गावातली गुरेढोरेही असत. काठावर मुशीच्या वाहत्या पाण्यात बायका भांडी घासत. पापडीवरच्या दगडी पडथरींवर कपडे धुण्यासाठी बायकांचे 'नंबर' लागत. मात्र एकीएकीचा नंबर येईपर्यंत एकमेकींच्या 'ऊवा'ही काढून होत. कपडे पडथरींवर आपटतानाचे आवाज तळ्याचा परिसर दणाणून सोडत. कधी पकडापकडी खेळता खेळता पोहणारी मुले पडथरींजवळ येत. तिथले पाणी 'खदुळ' झाले की मात्र कपडे धुणाऱ्या बाया पोरांचा उद्धार करीत. तळ्यात विविध रंगांची, पानांची, झुपक्यांची शेवाळे, लव्हाळी होती. अनेक प्रकारचे मासे होते, बेडूक, कासव, भुंगे, कोळी होते.

तळ्याच्या एका कोपऱ्यात तर 'जळवा' ही होत्या. एखादी जळू पायाला डसली तर मग रक्त शोषून घेतल्याखेरीज सोडायची नाही. मला तर अशा जळवांची जाम भीती वाटायची. पायाला डसलेली जळू बोटात पकडून ओढली की ती वादीसारखी लांबलचक व्हायची. तळ्यात पांढरी, लाल कमळे होती. तळ्याभोवती असलेल्या गर्द दाट बांबरातून झरे वाहत तळ्यात यायचे. तळ्याचा संपूर्ण परिसरच मस्त हिरवागार व थंड वाटायचा. संत्या, भायग्यासारखी पोरे तर दिवस दिवसभर तळ्यात पोहत. संत्याच्या रेड्यांचा, म्हशींचा अधिक तर दिवस तळ्यातच जायचा. उन्हाळ्यात सकाळी तळ्यात शिरलेल्या म्हशी सायंकाळपर्यंत तळ्यातच बसून राहत. दररोज एका रेड्याच्या किंवा म्हशीच्या पाठीवर बसून डुलत डुलत संत्या घरी जायचा. एकदा मी गंमत म्हणून संत्याच्या एका रेड्याच्या पाठीवर बसलो तर तो रेडा चौखूर उधळला. नशीब बलवत्तर म्हणून मी त्याच्या पाठीवरून पडलो नाही.



तळ्याच्या एका काठावर दामल्यांची वडिलोपार्जित आमराई होती. या आमराईत आंब्यांचे, फणसांचे अनेक विशाल वृक्ष होते. त्या काळात दामल्यांची आमराई तशी गावातील पोरांसाठी 'खुली' होती.कोणीही जावे आणि पडलेले आंबे टिपून न्यावे अशी तेव्हाची रीत होती. या आमराईत रायवळ आंब्यांची झाडे होतीच, पण थोडीफार माणकूल, पायरी व हापूस कलमेही होती. दामल्यांच्या परड्यात कापे, रसाळ अशा दोन्ही प्रकारचे फणस होते. एक फणस तर 'कुरणा' होता. तळ्यावर अंघोळीसाठी जाण्याआधी आम्हा पोरांचा दामल्यांच्या परड्यात एखादा तरी फेरफटका ठरलेला असे. टिपलेले आंबे टॉवेलात बांधायचे, सुधीरने किंवा भायग्याने फणसावर चढायचे, पिकलेले फणस खाली घसरून घालायचे. मग सर्व पोरांनी फणसांचा फडशा पाडायचा असे हे सारे ठरलेले वेळापत्रक असायचे. मग टॉवेलात बांधलेले आंबे तळ्यावर येऊन, पिंपळाखालच्या पापडीवर बसून मनसोक्त फस्त करायचे आणि मग दणादण तळ्यात उड्या घ्यायच्या असा हा आमचा दररोजचा



कार्यक्रम ठरलेला असे. फणसाखाली बसून, पिकलेले फणस फोडून खाण्यात एक निराळीच मजा वाटायची. सुधीर पिकलेला रसाळ फणस त्याच्या नखांनी अलवार फोडायचा तेव्हा पुराणकाळात नरसिंहाने हिरण्यकशपुचे पोट फाडल्याचा प्रसंग माझ्या डोळ्यांसमोर उभा राहायचा. सुधीरने असा फणस फोडल्यावर आम्ही सारे 'गिधाडागत' फोडलेल्या फणसावर तुटून पडायचो.

याच दिवसांत सायंकाळी भरडावर क्रिकेटचा डाव रंगायचा. दुपारी महापुरुषाच्या सावलीत गोट्यांचा खेळही असायचाच. रात्री जेवणाआधी घरातील सारेजण खळ्यात गप्पागोष्टी करत बसायचे. तिथेच मोठ्यांचा 'रमी- मुंबरी' तर छोट्यांचा 'मेंडीकोट' सुरु व्हायचा. सायंकाळचा मावळतीकडून येणारा थंड वारा अंगाशी छान मस्ती करायचा. पत्त्यांचे डाव इतके रंगात यायचे की, वळईत जेवणे वाढली तरी कोणी जागेवरून उठायचे नाही. मग आई, काकी वगैरे खेळणाऱ्यांवर जाम भडकायच्या.

त्या काळात घराबाहेर खळ्यात घातलेले मांडव बिनखर्चाचे होते. पोफळीच्या मेडी, फोक, माडाची विणलेली झापे असलेले मांडव पर्यावरणस्नेही होते. आमच्या मांडवासाठी लागणारी झापे आम्हीच विणत असू. त्या काळात अशी झापे विणायचा, केरसुण्या विणायचा आमचा वडिलोपार्जित छोटा व्यवसाय होता. याशिवाय नवीन घोंगडीला 'दश्या' घालणे, मासे, कुरल्या पडण्यासाठीची 'खून' विणणे, दोरी व मुसकी विणणे, नांगरदोरी वळणे यांसारखी कामेही माझे आजोबा घ्यायचे. मला आठवते, एका दिवसभरात मी तेव्हा साधारण वीस ते पंचवीस झापे विणायचो. आजही दरवर्षी मी अशी काही झापे विणतो. केरसुण्याही बनवतो. शिवाय हे पारंपारिक हस्तव्यवसाय माझ्या विद्यार्थ्यांनाही शिकवतो.

मे महिना म्हणजे बालपणापासूनच आमची चंगळ. पुर्वी दरवर्षी मे महिन्यात कुर्ल्याचे आप्पा गावी आले की दररोज सकाळी आमच्या बोटावर टूथपेस्ट द्यायचे. आप्पा गावी असेपर्यंत मग दररोज सकाळी अशी टूथपेस्ट बोटावर मिळायची. नाहीतर इतर काळात आम्ही 'मशेरी' लावायचो. आप्पा आम्हा मुलांना खास रिक्षा करून कुठे कुठे फिरवायचे. आंगणेवाडी, कुणकेश्वर, सिंधुदुर्ग किल्ला, सावंतवाडी अशी अनेक ठिकाणे ते आम्हाला फिरवून आणायचे. मालवणला सिंधुदुर्गावर जाताना दरवेळेस आमची घाबरगुंडी उडायची. समुद्रात अगदी अर्ध्यावर गेल्यावर होडी जोराजोरात डचमळायची. आम्हीच नाही तर, होडीतील इतर प्रवासीही घाबरायचे. जीव मुठीत धरून 'राम राम' म्हणत किल्ल्याच्या तडीवर गेल्यावर निःश्वास टाकायचे. परतीच्या प्रवासातही अशीच अवस्था व्हायची. आप्पांना माहीत होते, आपल्याशिवाय या गावच्या पोरांना कोण फिरवणार? त्यांची हौसमौज कोण करणार? आप्पा गावी असेपर्यंत आमचे सारे लाड पुरवायचे.

आता गाव आणि शहरामध्ये तसे फारसे अंतर राहिलेले नाही. गाव शहरांकडे जाण्यापेक्षा आता शहरेच गावापर्यंत आली आहेत. आता गावातली घरे, अंगणे, गडगे, मंडप अस्सल 'गावरान' राहिलेत कुठे! लोकांचे राहणीमान, खाणे-पिणे, आवडी-निवडी, साऱ्या गोष्टींचे 'शहरीकरण' झाले आहे. तरीही मी गंमत म्हणुन कधी 'गड्या, अपुला गाव बरा!' असे म्हणतो. मात्र तितक्यात कोणीतरी विचारतो,' गाव आता पुर्वीच्या गावासारखा राहिलाय का?'

साप्ताहिक सदर

# तिचा गौरव



चित्रा अविनाश नानिवडेकर,
सफाळे- पालघर.
मो. 9969669523

**लेखिकेचा परिचय :**
**चित्रा नानिवडेकर या प्रथितयश लेखिका व संवेदनशील कवयित्री आहेत. समाजात वावरताना आपल्या अवती भवती दिसणाऱ्या, दैनंदिन जीवनात जगताना पावलोपावली संघर्ष करणाऱ्या स्त्रियांच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न चित्रा नानिवडेकर आपल्या साप्ताहिक सदरातून करणार आहेत.**

## त्यांचा ही गौरव...!

दहावीच्या परीक्षेचा शेवटचा दिवस. सगळ्या वर्गाचं पिक्चर आणि नंतर हॉटेलिंग असा जंगी बेत ठरत होता.आता पुढे कोण कुठल्या मार्गाने जातील. कोणाला किती मार्क्स मिळतील,कोणतं कॉलेज मिळेल ह्याबद्दल चर्चा. शिवाय आत्तापर्यंत मुलांशी जरा न बोलणाऱ्या मुली सुद्धा आज सहज तयार झाल्या.

अपवाद फक्त समीर पवार. तो नेहमीच सगळ्यांपासून अलिप्त अलिप्त राहायचा त्याच्या मित्र मैत्रिणींनी खूप आग्रह केला. "चल रे सम्या ...एवढा काय भाव खातोस? आता निदान असं म्हणू नकोस की आईवडील सोडणार नाहीत. आजकाल कोणीच एवढं स्ट्रिक्ट नसतं. आणि तुझे बाबा आम्हाला माहिती आहेत. प्रत्येक मिटिंग, गॅदरिंग, सहल ते असतात तुझ्या बरोबर. चल की "
"नंतर सांगतो . आत्ता घरी जायचंय मला."
"हो रे .. आम्हीपण आत्ता घरीच जाणार. आपण संध्याकाळी पार्क मध्ये भेटायचं ठरलंय. ये नक्की."
उदास हसत समीर निघाला.मनात म्हणाला 'आपल्या घरची परिस्थिती कोणाला सांगणार? ह्या सगळ्यांच्या घरी कधीनाकधी जाऊन आलोय. त्यांच्या आईवडीलांचं एकमेकांशी नातं पाहिलंय आपण.'

संध्याकाळी चार सहाजण सरळ समिरच्या घरीच जाऊन थडकले . आपसात म्हणाले आज त्याला घेऊनच जाऊया. प्रत्येकवेळी काहीतरी कारण सांगून घरी न्यायचं टाळतोय. समिरच्या बाबांनी दार उघडलं. त्यांच्या हाताला पीठ लागलं होतं. बहुतेक कणिक मळता माळता दार उघडायला आले.
"अरे...तुम्ही? या या सम्या येतच होता. म्हणून मी लौकर स्वयंपाक करायला घेतला "
"काका.. आम्ही बाहेर जेवणार आहोत. आणि तुम्ही का स्वयंपाक करता काकी बाहेर गेल्यात का?"
तेवढ्यात आतल्या खोलीतून धडकन काहीतरी पडल्याचा आवाज आला. म्हणून सगळे आत धावले. समिरच्या आईने जोरात भांडी फेका फेकी सुरू केली होती. डोळे फिरवीत पुढे येत म्हटलं 'खबरदार... माझ्याशी कोणी बोललं तर...' त्यांचे पिंजारलेले केस, अस्तव्यस्त कपडे, हाताची वेडी वाकडी हालचाल...हे सगळं पाहून सगळे एकदम घाबरून मागेच झाले. समिरने आतल्या खोलीतून बाहेर येत तिला मागच्या मागे जवळ घेत म्हटलं "मम्मा.. अगं असं काय करतेस तू झोप कोणी तुझ्याशी बोलत नाही. बाबा ह्यांना बाहेर बसवा प्लीज. मी मम्मी बरोबर आहे."

बाहेर दोन्हीही हातात डोकं धरून रडवेल्या आवाजात त्याचे बाबा त्यांना सांगू लागले. गेली सात आठ वर्षे ही मनोरुग्ण आहे. मी आणि समा दोघेच तिला समोर लागतात. काय सांगू पोरांनो...एकही बाई कामाला टिकत नाही. ही येऊच देत नाही कोणाला. सगळं आम्ही दोघेच करतो. समाचं दहावीचं वर्ष,माझं ऑफिस सांभाळून घरातली कामं करून दोघे कसबसं हिला सांभाळतो. तुम्ही म्हणत असाल ह्या सम्याने कधीच का आम्हाला घरी बोलावलं नाही. पण कोणीही परकं समोर आलं की ही अशी व्हायलंट होते. आमच्या घराची दशा बघा...महिनोन महीने ह्या घराला बाईचा हात लागला नाही...आम्हाला दोघांना जमतं तशी साफसफाई करतो. पटपट स्वयंपाक आवरून तिच्या आसपास राहतो. कधीही असा आरडाओरडा करते...कधी स्वतःला रूम मध्येच कोंडून घेते...कित्ती हाका मारल्या तरी उघडत नाही...कधी तंद्री लावून स्वतःशीच बडबड करत बसते...तर कधी सक्काळीच लौकर उठून सगळा स्वयंपाक करते...त्या दिवशी घरातले सगळे नळ उघडून हसत बसली होती. दुसऱ्या दिवशी नेमका समिरचा गणिताचा पेपर होता. बिचारा रात्रभर सगळ्या खोल्या पुसत बसला होता...पोरांनो काय सांगणार तुम्हाला"

"पण काका...ईलाज असेल ना. डॉक्टर ना दाखवलं का?"
"हो.. हे सिझोफ्रेनिया आणि बायपोलर आहे म्हणतात. मेडिसिन सुरू केलंय. आता समीर तिला गोळ्या देईल. त्याचा असर असेल तेवढ्यावेळ झोपेल."
"काका.. रागावू नका. पण तुम्ही घटस्फोट का नाही घेत?"एका मुलीने धाडसाने विचारलं.
तेवढ्यात समीर बाहेर आला. म्हणाला "अगं बाबांनी एकदा प्रयत्न केला वकिलांशी बोलण्याचा. पण वकील म्हणतात जसा शारीरिक आजार असतो. तासाच हा मानसिक आजार असतो... म्हणून कोर्ट मान्यता देणार नाही. शिवाय मामा कडचे का म्हणून जबाबदारी घेतील? हा पण प्रश्न उरतोच ना. आम्हालाच अड्जस्ट करावं लागणार आहे. आणि आम्ही आता बायकांच्या एवढं परफेक्ट नाही पण त्यांच्या तोडीची सगळी कामं करतो. मी आता रात्र कॉलेजला प्रवेश घेईन.म्हणजे प्रश्न थोडा सुटेल... चला आपल्याला उशीर होईल. बाबा तुमच्या पोळ्या होईपर्यंत थाम्बतो आम्ही. भाजी झाली आहे. आईसाठी कुकर लावला आहे. तुम्ही जेवून घ्या."

खरंच असेही पुरुष आहेत ज्यांना बायकांच्या सारखं घर सांभाळावं लागतं. ह्या काल्पनिक कथनकातून मला पुरुषांचा गौरव अधोरेखित करायचा आहे.

**अभिप्रायाची वाट बघतेय.**



# अध्यात्म

ज्योतिर्विद
उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४



## दिवस कार्ये

मागील भागात आपण अस्थिसंचयनाबाबत माहिती घेतली. शवदहनविधी उरकल्यानंतर दिवंगत व्यक्तीचे प्रेतत्व निवारण करण्यासाठी पुढील ९ दिवस ' नवदिनश्राद्धे ' केली जातात. यांस ' अवयवश्राद्धे ' असेही संबोधले जाते.

पहिल्या दिवशी प्रथम दिन श्राद्ध, दुसऱ्या दिवशी द्वितीय दिन श्राद्ध,....., नवव्या दिवशी नवमदिन श्राद्ध याप्रमाणे नऊ दिवस ही श्राद्धे करावयाची असतात. सध्या बहुतांशी ही नवश्राद्धे नवव्या किंवा दहाव्या दिवशी एकाच वेळी केली जातात.

प्रथम दिवशी करण्यात येणाऱ्या श्राद्धात प्रेतावस्थेतील दिवंगत व्यक्तीस उद्देशून शिजवलेल्या भाताचा किंवा तांदळाच्या पिठाचा पिंड भूक भागवण्यासाठी दिला जातो त्यावर तहान भागवण्यासाठी तिळाचे पाणी दिले जाते. हा पहिला दिवशीचा पिंड प्रेतास शीर या अवयवाच्या निष्पत्त्यर्थ दिला जातो. याप्रमाणेच दुसऱ्या दिवशी दुसऱ्या दिवशीच्या श्राद्धात डोळे, नाक, कान इत्यादी अवयवांच्या निष्पत्त्यर्थ पिंड व तिलोदक दिले जाते. तिसऱ्या दिवशी हात, वक्ष, मान आणि मुख यांच्या निष्पत्त्यर्थ पिंड व तीलोदक दिले जाते. चौथ्या दिवशी कंबर, नाभी, गुदा, लिंग इत्यादी निर्माण होण्यार्थ पिंड व तीलोदक दिले जाते. पाचव्या दिवशी उर, मेरूदंड, मांड्या इत्यादी निष्पत्त्यर्थ पिंड व तिलोदक दिले जाते. सहाव्या दिवशी टाचा, पायाची बोटे, मरगड्या इत्यादींसाठी पिंड व तिळाचे पाणी दिले जाते. सातव्या दिवशी हाडे, मज्जातंतू, शिरा अर्थात रक्तवाहिन्या यांच्या निष्पत्त्यर्थ पिंड व तिलोदक दिले जाते. आठव्या दिवशी नखे रोम (अंगावरील केस) इत्यादी अवयव निर्माण होण्यासाठी पिंड व तिलोदक दिले जाते आणि नवव्या दिवशी दिवंगत पुरुष असल्यास वीर्य/स्त्री असल्यास रज इत्यादी निष्पत्त्यर्थ पिंड व तिलोदक दिले जाते. अवयवांच्या संबंधित ही श्राद्धे असल्यामुळे नऊ दिवसांच्या या श्राद्धांना ' अवयव श्राद्धे ' असेही म्हणतात. घराण्यामध्ये भविष्यात जन्माला येणाऱ्या संततीमध्ये विकृती, अधुत्व, अंधत्व, कर्णबधिरत्व, मूकबधिरत्व, अपंगत्व... इत्यादी येऊ नये तसेच गर्भ-कुपोषण, उपजत मृत्यू होऊ नयेत या फलप्राप्तीच्या अनुषंगाने ही दिनश्राद्धे असतात. म्हणून या श्राद्धांना अत्यंत महत्त्व आहे.

या श्राद्धांचा पुराणोक्त विधी (मार्गदर्शक पुरोहित किंवा गुरुजी उपस्थित नसल्यास) साधारणतः पुढीलप्रमाणे प्रयत्नपूर्वक करावा.

क्षौर करून स्नान केल्यानंतर दक्षिणेकडे तोंड करून बसावयास दर्भाचे आसन घेऊन बसावे. मंत्राशिवाय आचमन किंवा डोळ्यांना पाण्याचा स्पर्श (नेत्राचमन) करून दर्भाची पवित्रके घालावीत. उत्तरीय जाणव्याप्रमाणे वापरासाठी घ्यावे. शेंडी, उत्तरीय, डावी आणि उजवी कंबर यांच्या ठिकाणी तीळ, अक्षता व दर्भ धारण करावेत. पुढील प्रमाणे श्राद्धाचा संकल्प करावा...
' तिथिर्विष्णूस्तथावारो नक्षत्रं विष्णुरेव च । योगश्च करणं चैव सर्व विष्णुमयं जगत् ।। अध्यपूर्वोच्चारित वर्तमान एवं गुण विशेषण विशिष्टाया पुण्यतिथौ मम आत्मनः श्रुती स्मृती पुराणोक्त फलप्राप्त्यर्थ (गळ्यातील उत्तरीयाचे अपसव्य करावे) ...
' दिवंगताच्या गोत्राचे नाव घ्यावे... गोत्रस्य ... दिवंगत व्यक्तीचे नाव घ्यावे... प्रेतस्य प्रेतत्व निवृत्त्या उत्तम लोक प्राप्त्यर्थ मृताहे प्रथम दिन विधी करिष्ये। ' (पाणी सोडावे) ' तथा दाहजनीत तापोपशमनार्थ मृत्तिका स्नानादि करिष्ये। ' (पाणी सोडावे).
दर्भाच्या आसनावर अष्मा ठेवावा. (सव्य करावे) हातात जमिनीवरील शुद्ध माती घेऊन सूर्याला दाखवावी आणि ती माती कर्त्याने आपल्या कपाळाला लावावी व जमेल त्याप्रमाणे सर्व अंगाला लावावी. यानंतर स्नान करून डोक्यावर पाणी शिंपडून मार्जन व आचमन करावे (अपसव्य करावे).
' .. दिवंगताच्या गोत्राचे नाव घ्यावे.. गोत्रस्य.. दिवंगताचे नाव घ्यावे... प्रेतस्य दाहजनित तृषोपशमनार्थ एष तीलतोयांजली दानम् करिष्ये। ' (पाणी सोडावे) ' ... दिवंगताच्या गोत्राचा उल्लेख करावा... दिवंगताचे नाव घ्यावे... प्रेत जनित तृषोपशमनार्थ एष तिलतोयांजली स्तवोपतिष्ठताम् असे म्हणून पितृतिर्थावरून अंगठ्याने अश्म्यावर तिळाचे पाणी द्यावे. स्नान करावे किंवा त्या ऐवजी डोक्यावर पाणी शिंपडून घ्यावे. पंचगव्य (गाईचे दूध, दही, तूप, गोमूत्र व शेण मिश्रित पाणी) प्यावे व स्वतःच्या अंगावर व सर्वत्र शिंपडावे. उत्तरीय पाण्यात भिजवून त्याचे पाणी पितृ तीर्थावरून अंगठ्याने अश्म्याला देत म्हणावे...
' ... गोत्राचा उल्लेख करावा.. गोत्र... दिवंगताचे नाव घ्यावे... प्रेत दाहजनित तृषोपशमनार्थ ईदं वासोदकं स्तवोपतिष्ठताम्।
आता अष्म्याचे पूजन करावे.

याप्रमाणे प्रत्येक दिवशी नऊ दिवस करावे. त्यानंतर पहिल्या दिवशी... दुसऱ्या दिवशी... नवव्या दिवशी.. याप्रमाणे प्रत्येक दिवसाच्या श्राद्धात पुढील प्रमाणे एक एक पिंड त्रिकोणी वेदिका करून त्यावर दर्भ ठेवून दर्भावर द्यावा

**(उर्वरित भाग पुढच्या भागात )**

## सोनेरी दुनिया



श्री. श्रीराम शेटये.
नालासोपारा.

### मुकद्दर का सिकंदर - कादर खान

एक अभिनेता ज्याने आपल्या अभिनयाच्या सरवाची सुरूवात कब्रस्थानात केली. लहान वयात अभिनय काय असतो ? नाटक कशाला म्हणतात ? याची कोणतीही कल्पना नसताना या आधुनिक एकलव्याने कोणत्याही गुरूच्या मार्गदर्शना शिवाय कलेची साधना केली. स्मशनातून सुरू झालेला कलेचा प्रवास चित्रपट विश्र्वाच्या शिखरावर कसा पोहचला वाचा ही रोमांचक कहानी.

रात्रीची वेळ स्मशान शांतता पसरलेली आहे. एका कब्रस्थानात नुकत्याच दफन झालेल्या कबरी जवळ बसुन दोन लहान मुले जे भाऊ बहिन आहेत त्या कबरीला कवटाळून रडत आहेत. एवढ्यात एक फकिर येतो. त्यां बालकांचे सात्वंन करीत तो त्यांना विचारतो.
"किसके कब्र पर रो रहे हो बच्चो ?"
मुलगा, "हमारी मां मर गई है!"
फकिर, " चारो तरफ देखो बच्चो इनमे से किसी की मां मर गई है, किसी की बहन मर गई है, किसी का भाई मर गया है l
मौत से किसको रिश्तेदारी है ?
मौत से कौन बचता है ? आज उनकी तो कल हमारी है l
ईस फकिर की एक बात हमेशा याद रखना बेटा l
जिंदगी का अगर सही लुप्त उठाना चाहते हो ,तो सुख को ठोकर मारो दु:ख को गले लगा लो l
तकदिर तेरे कदमो मे होगी और तू मुकद्दर का बादशाह होगा l
ज़िंदा है वह लोग जो मौत से टकराते है l "
हे डायलॉग्स कादर खान यांनी लिहिले आहेत आणि ते चित्रपटात सुद्धा त्यांच्यावर चित्रित करण्यात आले आहेत तो चित्रपट होता मुकद्दर का सिकंदर.

मुकद्दर का सिकंदर या चित्रपटाचे सर्व डायलॉग्स त्यांनीच लिहिले आहेत. अमिताभच्या अनेक चित्रपटातील डायलॉग्स त्यांनीच लिहिले आहेत. सुहाग, अमर अकबर अंथोनी, खुन पसीना, मी. नटवरलाल , शराबी, कुली, लावारीस यासारख्या चित्रपटाचे संवादलेखन कादरखान यांनी केले.

परंतू कादर खान यांची जीवन कहानी वाचल्यावर आपण थक्क होतो. अत्यंत गरीब परिस्थितीत बालपण गेलेले कादर खान यांचा चित्रपटतील प्रवास हा अंत्यत रोमहर्षक आहे. कादर खान यांचा जन्म अफगाणिस्तान मधिल काबूल येथे झाला. कादरखान यांना लहानपणी एक सवय होती. दिवसभरात दुनियेतील घडणाऱ्या गोष्टी ते बघायचे आणि संध्याकाळी आपण दिवसभर जे काय बघितले त्यावर मनातल्या मनात आठवून मग एकपात्री अभिनय करायचे. अर्थात तेव्हा ते खुपच लहान होते. नाटक काय असते ? चित्रपट काय असतो? याची त्यांना सुतराम कल्पना देखील नव्हती. एक मजा किंवा खेळ म्हणूनच हे सर्व करीत असत.

त्यांच्या घराच्या बाजुला एक यहुदी लोकांचे कब्रस्थान होते. संध्याकाळी अंधारात तिकडे कोणी फिरकत नसे. शांतता असे अशा एकांतात कब्रस्थानाजवळ कादरखान दिवसभराच्या घडलेल्या घटनांचे एकपात्री नाट्य रचवून अभिनयासह सराव करीत असत हे त्यांचे नित्याचेच चाले.

असेच कब्रस्थानात एकदा चालू असताना कोणीतरी बॅटरीचा प्रकाश टाकला. हा मुलगा कब्रस्थानाजवळ काय करतोय?असा प्रश्न त्या व्यक्तिला पडला. त्या व्यक्तिने मुलाला विचारले "तु ईथे आंधारात हे काय करीत आहेस? मुलाने उत्तर दिले," मी दिवसभर ज्या घटना दिवसभर बघतो त्या रात्री मी ईथे रीपीट करण्याचा प्रयत्न करतो."
"नाटकात काम करणार काय?"
असे त्या व्यक्तिने विचारले पण
कादरखान वयाने लहान होते नाटक काय असते? हे त्यांना माहित नव्हते.

प्रश्न विचारणारी ती व्यक्ति म्हणजे ४० च्या दशकात सहाय्यक अभिनेत्याची चित्रपटात भुमिका करणारे अशरफ खान होते. त्यांनी कादरखान यांना आपल्या बंगल्यावर बोलावले. कादरखान यांना त्यांनी काही डायलॉग्स वाचायला दिले. कादरखान यांची डायलॉग्स बोलण्याची पद्धत त्यांना आवडली. अशरफ खान यांनी त्यांना आपल्या नाटकात भुमिका दिली. त्या काळात नाटके चित्रपटगृहातील स्टेजवरच होत असत.

कादर खानचे कुटुंब काबूल वरून भारतात आले होते. मुंबईतील कामाठीपुरातल्या गरीब वस्तीत रहात होते. गरीबतही कादर खान यांनी सिविल इंजीनियरिंग मध्ये ग्रॅज्युएशन पुर्ण केले होते. ' ताश के पत्ते' नावाचे एक नाटक कॉलेजच्या प्लॅटफॉर्मवर कादरखान करीत होते. हे नाटक पहायला सिनेविश्वातील विनोदी अभिनेते 'आगा' आले होते. आगा यांना कादरखान यांचा अभिनय आवडला. त्यांनी ही गोष्ट दिलीप कुमार यांना सांगितली. एकदा दिलीप कुमार स्वत: नाटक पहायला आले. कादरखान यांचा अभिनय त्यांना एवढा आवडला की त्याच मंचावर दिलीप कुमार यांनी आपल्या 'सगीना महतो' आणि 'बैराग' या दोन्ही आगामी चित्रपटात कादरखान यांना चांगली भुमिका देत असल्याची घोषणा केली. कब्रस्थानात सुरू झालेला अभिनय प्रवास अशा प्रकारे रुपेरी पडद्यावर पोहचला!

## वाचायलाच हवे असे

### मतदान एक राष्ट्रीय कर्तव्य

दीपक गुंडये,
मुंबई

दर पाच वर्षांनी लोकशाहीप्रधान भारतात विविध राज्यात विधानसभेसाठी तर संपूर्ण भारतात लोकसभेसाठी निवडणुका होत असतात. या निवडणुकात उभे असलेले उमेदवार नागरिकांनी दिलेल्या मतांवर निवडून येत असतात. म्हणजेच नागरिकांचे मतदान महत्वाचे असते.

भारताची लोकशाही ही लोकांनी चालवलेली राज्यपद्धती आहे. पण देशातला प्रत्येक नागरीक लोकसभेत जाऊन राज्य कारभारावर चर्चा करू शकत नाही, म्हणून त्याने आपले प्रतिनिधी लोकसभेत पाठवून त्यांच्यामार्फत देशाचा कारभार पहावा अशी अपेक्षा आहे. हे प्रतिनिधी जेवढे चांगले असतील तेवढा देशाचा कारभार चांगला होईल आणि लोकांच्या हिताचा होईल. मात्र याबाबतीत प्रत्येक नागरिकाने मतदान करून आपले मत व्यक्त केले पाहिजे. जे लोक मतदान करणार नाहीत ते देशाच्या कारभाराच्या बाबतीत उदासीन आहेत असे म्हणावे लागेल. ही उदासीनता झटकून प्रत्येकाने आवर्जून मतदान केले पाहिजे. आपल्या देशात मतदानादिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्याची पद्धत आहे.

खरे म्हणजे प्रत्येक कर्मचाऱ्याला कार्यालयीन कामातून थोडी सुट्टी दिली तर तो मतदान करून येऊ शकतो. त्याला पूर्ण दिवस सुट्टी देण्याची गरज नाही. परंतु लोकांच्या मनात मुळातच मतदानविषयी उदासीनता असते, त्यातच काम लागले तर मतदान टाळण्यास लोक तेवढाच बहाणा सांगत बसतील म्हणून मतदानादिवशी सार्वजनिक सुट्टी देण्याचा नियम सरकारने केला आहे. मात्र काही लोक सुट्टी मिळून सुद्धा मतदान करत नाहीत. सुट्टीचा फायदा घेऊन सहकुटुंब सहलीला जाण्याचा आनंद लुटतात. सहलीचा आनंद लुटायला काही हरकत नाही, पण सकाळी सकाळी लवकर मतदान करून वाटल्यास अशा लोकांनी सहलीला जावे. मात्र अशी सोय असून सुद्धा असे लोक मतदानाला दांडी मारून सहल काढतात आणि त्यात त्यांना धन्यता वाटते. त्यांना घटनेने आपल्याला दिलेल्या अधिकाराचा अर्थ कळत नाही. मतदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे आणि ते एक राष्ट्रीय कर्तव्य आहे हे त्यांना कळायला हवे.

थेंबे थेंबे तळे साचे या उक्तीप्रमाणे एका-एका मतानेच मतांचा डोंगर उभा राहतो. यामुळे प्रत्येक व्यक्तीने मतदान करून आपला मतदानाचा हक्क बजावण्याबरोबरच लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी आपलाही खारीचा वाटा उपयुक्त होतो ही बाब गांभिर्याने लक्षात घ्यायला हवी. देशाच्या हितासाठी व विकासासाठी मतदान करणे आवश्यक आहे. मतदार हा राजा आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदारांनी निवडणूकीत मतदानाचा पवित्र हक्क बजावला पाहिजे. आणि मतदान या सर्वश्रेष्ठ दानाचे पुण्य आपल्या पदरात पाडून घ्यायला हवे.

निवडणूकीमध्ये मतदारांचा सहभाग वाढावा यासाठी योग्य ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. एकूण लोकसंख्येमध्ये आजही अशिक्षित समाजाचे प्रमाण लक्षणीय आहे. अशा मतदारांना निवडणूकीच्या कार्यक्रमाचे महत्व समजावून सांगून लोकशाही प्रक्रियेचे महत्व पटवून देणे आवश्यक आहे. त्यासाठी लोक शिक्षणाच्या माध्यमातून जनजागृती करणे गरजेचे आहे. याशिवाय सामाजिक चालीरीती, रुढी परंपरा यामुळे मतदानाचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष संवाद साधून या चालीरीती, परंपरा यातील दोष, उणीवा दूर करण्यासाठी हस्तक्षेप करणे गरजेचे आहे. याशिवाय गरीब जनतेला आर्थिक मोह दाखवून मतदानाला प्रवृत्त केले जात आहे असेही दिसून आले आहे. यास्तव शिक्षणाच्या माध्यमातून जनजागृती करणे प्रामुख्याने गरजेचे आहे. तर बऱ्याचशा सुशिक्षित मतदारांमध्ये मतदानाविषयी उदासीनता आढळते. उच्चभ्रू मतदार तर आपल्या गगनचुंबी इमारतीतून मतदानासाठी उतरतही नाहीत. मतदान या सर्वश्रेष्ठ दानाचे महत्त्व अशा सर्वच घटकांना कळल्यास मतदानाची टक्केवारी वाढून योग्य व सक्षम लोकप्रतिनीधी निवडले जातील. आणि मतदानाचे श्रेष्ठ कर्तव्य बजावल्याचे समाधान मतदारांना मिळेल.



# सरकारी योजना/नोकरी

## आंतरराज्यीय कृषी माल व्यापार: रस्ता वाहतूक सबसिडी योजना (अद्ययावत)

**प्रस्तावना:**

**फळे आणि भाजीपाला उत्पादनात महाराष्ट्र अग्रेसर आहे. विशेषत: कांदा, टोमॅटो, डाळिंब, द्राक्षे, केळी, आंबा आणि भाजीपाला राज्यात मोठ्या प्रमाणावर पिकवला जातो. फळे आणि भाजीपाला नाशवंत असल्याने अनेक वेळा अयोग्य हाताळणी आणि वाहतुकीला होणारा विलंब यामुळे सुमारे 20 ते 30 टक्के शेतीमाल वाया जातो. शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच कृषी उत्पन्न सहकारी संस्थांना परवडणाऱ्या वाहतूक खर्चामुळे नाशवंत शेतमाल इतर राज्यात पाठवण्यास अनेकदा अडथळा येतो. ही वस्तुस्थिती महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या (MSAMB) विचाराधीन होती, ज्यामुळे शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी उत्पन्न सहकारी संस्थांना रस्ते वाहतूक अनुदान देऊन राज्याच्या आंतरराज्य व्यापाराला चालना मिळावी.**

**निर्णय:**

महाराष्ट्रातील कृषी मालाच्या आंतरराज्य व्यापाराला चालना देण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत रस्ते वाहतूक अनुदान योजना राबविण्यात येणार आहे. त्यानुसार योजनेच्या तारखेपासून 31.3.2026 पर्यंत देशांतर्गत रस्ते वाहतूक भाड्यात अनुदान देण्यासाठी खालील योजना जाहीर करण्यात येत आहे. योजनेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

- **ही योजना महाराष्ट्रातून इतर राज्यांमध्ये रस्ते वाहतुकीद्वारे शेतमालाच्या थेट विक्रीच्या व्यवहारासाठीच लागू असेल.**
- **राज्यातील नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी उत्पादक सहकारी संस्था या योजनेंतर्गत अनुदानास पात्र असतील.**
- **शेतीमाल पाठवणे बंधनकारक आहे; नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या, कृषी उत्पादक सहकारी संस्थांच्या सदस्यांनी इतर राज्यात उत्पादित केले.**

**योजनेंतर्गत काम सुरू करण्यापूर्वी अर्जदार संस्थेला पणन मंडळाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक आहे.**

- **ही योजना फक्त आंबा, केळी, डाळिंब, द्राक्षे, संत्रा, मोसंबी, कांदा, टोमॅटो, आले आणि भाजीपाला या नाशवंत पिकांसाठी लागू असेल.**
- **नाशवंत शेतमाल यादीत नमूद नसल्यास, लाभार्थी संस्था/कंपनीला तसे स्पष्टपणे सांगून पणन मंडळाची पूर्वपरवानगी घ्यावी लागेल.**
- **या योजनेंतर्गत रस्त्याने वाहतुक केलेल्या कृषी मालावर अनुदान देय असेल.**
- **यामध्ये इतर कोणत्याही आनुषंगिक खर्चाचा समावेश असणार नाही आणि कृषी उत्पादनाच्या प्रत्यक्ष विक्रीनंतरच अनुदान देय असेल.**
- **या योजनेंतर्गत वास्तविक वाहतूक अंतरानुसार खालील अनुदान देय असेल.**

**पणन मंडळाच्या नियमानुसार शॉपिंग कॉम्प्लेक्सचे बांधकाम वगळता विकासकामांसाठीचे व्याजदर पुढीलप्रमाणे आहेत.**

**१) किमान 350 ते 750 किमी:**
वाहतूक खर्चाच्या 50% किंवा कमाल रु.20,000/- यापैकी जे कमी असेल.

**2) 751 ते 1000 किमी**
वाहतूक खर्चाच्या 50% किंवा कमाल रु.30,000/- यापैकी जे कमी असेल.

**3) 1001 ते 1500 किमी**
वाहतूक खर्चाच्या 50% किंवा कमाल रु.40,000/- यापैकी जे कमी असेल.

**4) 1501 ते 2000 किमी**
वाहतूक खर्चाच्या 50% किंवा कमाल रु.50,000/- यापैकी जे कमी असेल.

**5) 2001 किमी आणि त्यावरील**
वाहतूक खर्चाच्या 50% किंवा कमाल रु.60,000/- यापैकी जे कमी असेल.

**6) सिक्कीम, आसाम, अरुणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोराम, मेघालय आणि त्रिपुरासाठी,**
**वाहतूक खर्चाच्या 50% किंवा कमाल रु.75,000/- यापैकी जे कमी असेल.**

- **महाराष्ट्राच्या सीमावर्ती जिल्ह्यांमधून शेतमाल नियमितपणे लगतच्या राज्यांमध्ये जात असल्याने, अपारंपरिक आणि दूरच्या बाजारपेठेत कृषी माल पाठवणे व्यवहार्य बनवण्यासाठी 350 किमी पेक्षा कमी अंतरावरील वाहतुकीसाठी कोणतेही अनुदान दिले जाणार नाही.**
- **या योजनेंतर्गत लाभार्थी कृषी उत्पादक सहकारी संस्था/उत्पादक कंपनी जास्तीत जास्त रु.च्या वाहतूक अनुदानासाठी पात्र असेल. एका आर्थिक वर्षात 3.00 लाख. हे अनुदान फक्त महाराष्ट्रातून इतर राज्यांमध्ये जाणाऱ्या एकेरी वाहतुकीसाठी लागू असेल.**
- **शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्थेने वाहतूकदाराला देय असलेल्या वाहतूक भाड्याची रक्कम चेक/RTGS/ऑनलाइन बँकिंगद्वारे देणे बंधनकारक असेल.**
- **आनुषंगिक खर्च जसे की हाताळणी, वर्गीकरण, प्रतवारी, पॅकिंग, हमाली, वाहतूक आणि कंपनी/संस्थेचे सेवा शुल्क इत्यादी शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्थेला मिळालेल्या कृषी उत्पादन विक्री रकमेतून वजा करून, उर्वरित संबंधित उत्पादक सदस्याच्या खात्यात रक्कम जमा केली जाते ते परिवहन अनुदानासाठी अर्ज करू शकतात. कपातीची रक्कम आणि आनुषंगिक आर्थिक व्यवहार ही संबंधित कंपनी/संस्था आणि उत्पादक सभासद शेतकरी यांची अंतर्गत बाब असेल. या संदर्भात महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचा कोणताही संबंध राहणार नाही**

- **महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाला अनुदान पूर्णपणे, अंशत: नाकारण्याचा किंवा पूर्ण मंजूर करण्याचा एकमेव अधिकार असेल आणि तो निर्णय संबंधित अर्जदारावर बंधनकारक असेल. तसेच, अटी व शर्तींमध्ये योग्य ते बदल करण्याचे अधिकार पणन मंडळाला आहेत.**
- **संबंधित शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्थेने शेतमालाची विक्री केल्यानंतर आवश्यक कागदपत्रांसह अनुदानाचा प्रस्ताव विभागीय कार्यालयात ३० दिवसांच्या आत सादर करावा.**
- **इतर राज्यांना शेतमाल पाठवताना, शेतकरी उत्पादक कंपनी/संस्थेच्या किमान 3 उत्पादक सदस्यांचे शेतमाल 1 खेपमध्ये पाठवणे आवश्यक असेल.**
- **महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाकडे वरील अटी व शर्तींनुसार आंतरराज्यीय कृषी रस्ते वाहतूक अनुदान प्रस्तावासाठी खालील कागदपत्रे सादर करावीत.**



**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ॲंड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक- विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क:rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क:sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862



## समजुतीची पिटी...

रीना पास्ते परब,
सावंतवाडी

"काय नाय गो परड्यात... गव रेडे काय्यक ठेयनत नाय... वगीच परडा केलंय. म्हेनत केल्ली फुकट गेली..." माई सवग्या वांगडा बोलत बोलत वाटेवरसून वरते सरली... खळ्यात यवन तिना टकलेरला घमॅल पायरेर ठेयला. दांडयेरले कपडे वडून लोट्यार टाकलेन. तितक्यात थय सवग्या फणसाची भाजी घेवन इला. माईन भायरच हाता पायार पानी वतला. सवग्यान केळीच्या खोल्यारली हुनहूनीत भाजी माईच्या हातीर ठेयली. ता दुकू थयच गजालीक बसला. "अगो  परडा लायलय. मर मर करून घागरीनी शिपलय... भाजी पालो खावचेपुरती तरी गावात, चार मिरशांगे मिठाक लावक गावतीत, तर कसला काय, गव रेडे काय ठेयनतच नाय. नाट मोडली ती तेंचि..." माई फणसाची भाजी खाता खाता बडबड करी होती.

सवग्यांची मुंबैसून यवन आठच दिस जाल्ले. पोरांका मे म्हयन्याची सुटी लागली काय सवग्याचो घो त्यांका हाडून सोडता. परत शाळा सुरू जावचे आदी व्हराक यता.
"अगे काल बाबूक घेवन पैलाडी गेल्लय. दोन फणस काडून हाडलव. यकाची श्याक केलंय, योक पिकत ठेयलय. पोरांका कापे गरे खावचे आसत..." सवग्या बोला होता. तितक्यात माईन हुतला.
"बरा केलंस काडून हाडलस ते फणस... जग मुलुख खावन जातला... धर ही वायंगी... वाली चारच आसत गो नाय तर दितलय होतंय... फाल्या केलंय काय तुका उष्टावक दितय..." माईन वायंगी फुडे करीत हुतलेन... ती घेवन सवग्या घराक गेला. माईन घरात यवन चुलीत आग केली. आदनाक पानी तापत ठेवन ती टीवी लावक वळयत इली. कार्यक्रम बगीत तिना तांदूळ आसडले. धुवन आदनात तांदूळ वतून ती भायर परत टीवी बगूक बसली. टीवी बगता बगता भात जालो तशी ती जावन सवग्याथुय बसली. गजाली मारीत बसली ती थयच रवली. हडे घरात घोवान यवन आपली आपुन चाय करून खाल्यान तरी माई तडेच होती. माई खूप वगतान घरात इली बगता तर चुलीकडे भांड्यानचो आवाज येय होतो.

"काय ओ... इलास ते माका साद घालूक नाय... मीया हयता खालते सवग्याचे गजालीक बसललय..." माईन सांगलेन.
"चाय करून खालास...? हयता काय ढवळलास...?" माई टॉपात बगीत ईचारी होती...
"पिटी ती ढवळलय... बगलय तर भात केल्लो होतो... वांगडाक पिटी करूया हुतला..." घोवान असा हुतल्यार माई गप रवली. कामासून यवन त्येंनी पिटी केली हुनान तिका वायच कसातरीच वाटला.
"मिया करतलंय होतंय कायतरी... तुमी टीवी बगीत बसाच्या होतास..." माईन असा हुतल्यार तिच्या घोवान हुतल्यान "रोज तियाच करतो मगो... येक दिस मिया केलंय तर काय जाला... तुका दुकू गरम गरम कोणी करून वाढू व्हया कदी तरी..." माईच्या डोळ्यात दुका इली. आज परडा गव रेड्यान उरबडल्यान हुनान वैतागलली माई घोवाचे हातची गरम गरम पिटी खावन सुशेगात निजली....






## काप्या काजीची बोंडा



वयल्यांचा कवग्या,
मालवण- सिंधुदुर्ग.

मे महिन्यात गावाक गेल्यार आंबे, काजी, फणस नि जांभळा. पोटभर खायची नि घरातली कामा करायची. सुट्टीत हौस म्हणान गावाक येतव खरा पण कामा काय चुकलीहत काय? खय गेला तरी कामा काय चुकनत नाय. बरा, मे महिन्यात गावात लग्नांक लय जोर येता. एकतर पाणी कमी तेच्यात लग्नांचो बोवाळ. तरी बरा, आता पुर्वीसारखे कंबरेवरसून दुडी आणूचे लागत नाय. सतुभावजीनी पंपाचा बटाण सुरु केल्यानी काय पाणी घरात. नायतर पुर्वी पाणयाचे काय काय वनवास व्हायचे गे बाय. तळ्यावर एक मस्त झरो हा. त्याच झऱ्याचा पाणी पुर्वी सगळीजणा नेत. झऱ्यावर ही गर्दी. तेच्यात पुन्हा झऱ्यावर जावची वाट हडधडीची. कधी पाय घसरात नि हंडो कपाळावर पडात समजाचा नाय, आणि अशी दूड बिड कधी पडली नि पोका इली तर सासू घरात ठेयत काय वो?

आमच्या परड्यात म्हणशात तर सगळ्या जातीचे आंबे. आता तेच्यातले काय काय कमी झाले म्हणा. पण काय काय आजून तग धरून हत. लोणचो आंबो, कापो आंबो, तुळशीतलो आंबो, साखरी बिटकी, काळी बीटकी, लाल बिटकी, नारळो आंबो, गोडो आंबो, आंबटोळो आंबो, केळयो आंबो, आणखी पण बरेच हत. तशी एक कापी काज पण हा परड्यात. तिका कापी काज कशाक म्हणतत तर तिचे बोंडू ना पिकान खाली पडले तरी कडकच आसतत. नरम अजिबात नाय. आणि काजीची बी म्हणशात ना तर किती पिळवटा, सहजासहजी येत नाय. तशी कापी काज फेमस हा. कारण ती वर्षातना दोनदा तरी धरता. आता गीमात आणि परत पावसात. त्यामुळा आम्ही गणपतीच्या फुड्यातय काजीचो बोंडू ठेवक शकतव. पावसाळ्यात बोंडू पिकलो तरी बी मात्र वलीच आसता. सुकना नाय.

आता ह्या काप्या काजीवरना आठावला. गुदस्ता ना वाडीतल्या परबांच्या बायग्याचा लगीन हुता. लगीन परबांकडेच हुता. नवरो उचलान इललो. आम्ही सगळे होवळ्ये नटान थटान लग्नाक गेलंव. लग्नाचे विधी सुरु झाले. पुण्यवचन सुरु झाला की मगे आमच्या बायकांक ओवये सुचतंत. पुण्यवचन सुरु झाला तशे नवऱ्याकडचे बायका आमच्याकडे बघून होवये गावक लागली. ' काप्या काजीची बोंडा, काप्या काजीची बोंडा। अशी काय होवळ्यांची तोंडा, अशी काय होवळ्यांची तोंडा॥,
चारचौघात असा कोण बोलल्यावर कोण बाई माणूस गप्प ऱ्हवात काय वो?

लगेच आमची गावडीन फुडे झाली. तिना माईक हातात घेतल्यान. होवये सुरु केल्यान,

**' नवरो जुनवट गे बाये, नवरो जुनवट गे बाये।**
**तुका कसो कळलो गे बाये, तुका कसो कळलो गे बाये।**
**हळद लावतना हात लागलोSSSS!॥'**

नवऱ्याकडच्या होवळ्यांका लाजेन मेल्यासारख्या वाटला आसात नाय? तर अशी ही काप्या काजीच्या बोंडांची गजाल. कशी वाटली?



## आठवणींच्या गोष्टी

राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३१४४३५६..

# अनुलेखाची पर्वा करायची नाही


काही दिवसा पूर्वी मला माझा एक मित्र भेटला .,काय कसा आहेस ?चौकशी केली, मी म्हटलं मस्तच चाललंय माझ !,तू कसा आहेस ? माझा प्रश्न त्यांनही माझ्यासारखीच प्रतिक्रिया दिली . बऱ्याच दिवसांनी भेटलाय आणि तो माझ्या सारखाच चहा शौकीन असल्याने विचारलं, चहा घेणार का ? काय अगदी परक्या सारख विचारतोस ? घेणार का चहा ? चल नाश्ता पण हवा म्हणाला.

समोर दिसणाऱ्या हॉटेलात गेलो हॉटेल मध्ये भजी खाताखाता काहीतरी आठवल्यासारख तो म्हणाला अरे तुला बरेच दिवस सांगीन म्हणतोय ! पण विसरलोच बघ. आता आठवण झाली. मलाही आश्चर्य वाटलं काय एवढं हा सांगायच विसरला एवढे दिवस. सांग काय ते, मी हे वाक्ये बोलताच म्हणाला, तू हे वॅट्सअपवर काय लिहितोस, पाठवतोस ते आज पासून बंद कर!, कोण चांगल म्हणत नाहीच, लाईक ,प्रतिसाद नाहीच पण तुझी चेष्टा करतात .यापुढे लक्षात ठेव !काय सांगतोय ते ! माझ्याच पैश्याची भजी ,चहा घेऊन हा मलाच धमकी देतोय की काय असा मनात विचार आला. अर्थात त्याच ते बोलणं मनापासून प्रेम होत. मी हसतच म्हटलं अरे जावू दे कुणी शाब्बास म्हणावं कौतुक कराव यांसाठी कुठलीच गोष्ट मी आजवर केलेली नाही, करत नाहीच आणि यापुढे करणारही नाही आणि हो प्रत्येक वेळी माझ्या पोस्टला इतरांनी लाईक कराव अशी माझी इच्छाही नाहीच. तो माझा स्वानंद असतो.

बऱ्याच ग्रुपच्या काही अड्मीननी मला त्यांच्या ग्रुपला घेतलं आहे. तुंम्ही लिहीत चला प्रतिक्रिया देत रहा असं सांगून ग्रुपला घेतलं आहे. खरंच काही चांगल्या पोस्ट ही वाचायला मिळतात, नवीन माहिती मिळते, मी पण मग स्वतःकाही लिहितो, काहींना आवडत, त्यावर चर्चा पण होते, कधीतरी बदल करून पुन्हां शेयर्स करतो. अर्थात मी सुद्धा सर्वच ग्रूपच्या सर्वांच्या पोस्टला फारस लाईक करत नाहीच. मग त्याच उत्तर अरे त्या त्यांच्या लोकांनी फॉरवर्ड केलेल्या पोस्ट असतात, तू तर स्वतःच काहीतरी लिहून शेयर्स करत असतोस !

माझ्या विषयी असणारी आपुलकीने तो बोलत होता .हॉटेल मधून बाहेर पडताना पुन्हां तोच सल्ला देऊन मार्गस्थ झाला. मी मनात विचार करत राहिलो. हल्ली सर्वत्रच अशी स्थिती आहे. आपण एवढा कोण मोठा ? मित्राच्या बोलण्यात वास्तव होत आणि ते काय मला त्याच्या आधीही कळलं होत,समाजात ही पूर्वापार रीत आहे लोक ठराविक अंतरा पर्यंत तुमची स्तुती कौतुक करणार पण जेव्हा तुंम्ही त्यांची बरोबरी करता किंवा त्यांच्या पुढे जाण्याचा प्रयत्न कराल तेंव्हा तो मग तुमच्या गुणाऐवजी दोष कुठं दिसतोय का तो शोधून तुमच्या चांगल्याची बदनामी करणार अर्थात सर्वच काही तसे नसतात. तुमचा अणुलेख बदनामी चेष्टा कोण करतो एक तर ज्याला त्यातलं कळत नाही तो, जो काहीच करत नाही तो किंवा हा आपल्या पेक्षा वरचढ होणार असं ज्याला वाटत तो किंवा कायमच दुसऱ्याच जे चांगले वाईट सांगण्याचा ज्याचा स्वभाव आहे असेच लोक तुम्हांला टाळतात अनुलेख करतात आणि हल्ली कौतुक ,अभिनंदन, शुभेच्छा, श्रद्धांजली हे शब्द ग्रूपवर लिहिताना तो आपल्या जातीचा ,त्यात नात्याचा ,मग जवळचा आहे का ? नोकरीत तो वरिष्ठ आहे की कनिष्ठ पदावर, संस्था, संघटनेत, आपल्या मागेपुढे किती असतो, त्यात पुन्हां गटतट, विरोधक की समर्थक, पुन्हां याला मोठा मोठा म्हटलं तर आपण छोटे होणार नाही ना ? ही पण भीती मनात, तेंव्हा या व्यवहारिक समाजात ,आपल स्थान ते काय असणार ? आपण लोकांकडून असल्या अपेक्षा का कराव्यात, संगणक युगात तुमचे लाईक वाढले म्हणून विचारांची आणि आयुष्याची उंची वाढणार आहे का ? चॅटींगला स्तुती करणारा तुमचा खरा हितचिंतकच आहे, न करणारा विरोधक समजू नये.

समाजात आपण आपल्या मार्गाने जात रहावं आणि स्वतःच स्वतःच आत्मपरीक्षण केलं की बऱ्याच प्रश्नांची उत्तरे मिळतात. मित्राच्या एका सल्ल्याने विचारचक्र फिरत राहिले .पिढ्यान्पिढ्या समाजात हे असंच सुरू आहे .म्हणून आपण आपला मार्ग योग्य दिशा आणि दूरदृष्टीने बदलला आपल काम निरपेक्ष भावनेने करत राहिलो तर वॅट्सअप पोस्टच्या लाईक पेक्षाही आपल लाईफ सकारात्मक होईल .फक्त आपली मानसिकता बदलता कामा नये .आपल्या मार्गाने चालायच.अनुलेखाची पर्वा करायची नाही .



## साप्ताहिक सदर
## समुपदेशन

अमरनाथ परब
9833606655



# पंचांग

**पंचांग वाचून मिळतात. पांच फायदे....**

👆 वेदांचा अभ्यास प्राचीन काळापासून सुरू आहे.त्यातही शिक्षण, श्लोक, व्याकरण,निरुक्त, ज्योतिष आणि कल्प ही सहा वेदांग आहेत, ज्याला त्यात रस असेल तर ते अभ्यासत असतं.यामध्ये ज्योतिष शास्त्राला वेदांचा डोळा मानण्यात आला आहे.ज्योतिषशास्त्रासाठी पंचांग विद्या जाणून घेण्यासाठी खुप आवश्यक आहे आणि अवघड ही आहे.पंचांग पठण आणि श्रवण केल्याने लाभ होतो असं म्हणतात.

🌏सूर्य, चंद्र, पृथ्वी,व नक्षत्रांची स्थिती,अंतर आणि हालचाल याविषयी वेद आणि इतर ग्रंथांमध्ये वर्णन केले आहे.पृथ्विवरील दिवस रात्र आणि इतर संधिकाल यांना स्थान,अंतर, आणि गती या मूल्यांवरून विभागून पूर्णपणे अचूक पंचांग तयार केले गेले.पंचांग कालमध्दे दिवसांची नोंद देण्याची पध्दत आहे.

📕 कॅलेंडरची चक्रे खगोलशास्त्राच्या घटकांशी जोडलेली असतात. बारा महिन्यांचे वर्ष,सात दिवसांचा आठवडा ठेवण्याचा प्रघात विक्रम संवतापासून सुरू झाला. महिन्याचा हिशेब सूर्य आणि चंद्राच्या गतीवर ठेवला जातो.....

📗 पंचांग हे नांव,तिथी,वार, नक्षत्र,योग, आणि करण या पाच प्रमुख भागापासून बनलेले असते.त्याच्या गणनेच्या आधारे, हिंदू पंचांगाचे तीन प्रवाह आहेत.
पहिले - चंद्रावर आधारित.
दुसरे - नक्षत्रावर आधारित
तिसरं - सूर्यावर आधारित
कॅलेंडर प्रणाली,

📘भारतभर वेगवेगळ्या स्वरूपात तो साजरा केला जातो.आपल्या वर्षात १२ महिने असतात. प्रत्येक महिन्यात १५ दिवसांचे दोन पक्ष असतात. १-शुक्ल २- कृष्ण पक्ष. प्रत्येक वर्षी दोन मार्गक्रमण असतात.२७ नक्षत्र हे दोन आयनांनी राशींमध्दे भ्रमण करत राहतात.


📙पंचांग वाचणे आणि श्रवण करणे खूप शुभ मानले जाते.असे मानले जाते की, भगवान राम देखील पंचांग ऐकत असत. प्राचीन काळी तोंड करून ठेवण्याची प्रथा होती. कारण त्या आधारे सर्व काही कळू शकते....

1️⃣ पंचांगाचे पठण आणि श्रवण केल्याने आई लक्ष्मी प्रसन्न होते आसं शास्त्र सांगते.तिथीचे महत्व काय ? कोणत्या तिथीला कोणते कर्म करावे किंवा करु नये हे पंचांग पाहून जाणून घेणे फायदेशीर ठरते.

2️⃣ आठवड्यातील सात वारा मध्ये कोणत्या घटना, कोणत्या वारी होतील.त्या दर्घटना वाचवता येईल का ? हे जाणून घेणे फायदेशीर ठरते...
3️⃣ नक्षत्रांचे पठण व श्रवण केल्याने पापाचा नाश होतो.एकूण २७ नक्षत्राचे महत्व काय आहे आणि कोणते काम कोणत्या तिथीला करावे किंवा करु नये हे जाणून घेणं आवश्यक असते,

4️⃣योगाचा अभ्यास ऐकल्याने, केल्याने प्रियजनांचे प्रेम मिळते.योगाचे महत्व शुभ कि अशुभ असते का हे जाणून घेता येते,

5️⃣ एकुण ११ कारणे असतात.कारणे ऐकून किंवा वाचून सर्व प्रकारच्या मनोकामना पूर्ण होतात,कारणाचे महत्व काय, त्यानुसार कोणत्या तारखेला कोणते काम करावे जेणेकरून ते लाभदायक ठरेल...





## पेस्ट्री



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

**पेस्ट्री**

**साहित्य**

- 2 कप मैदा
- 1 कप थंड बटर, लहान चौकोनी तुकडे करा
- 1/2 टीस्पून मीठ
- 1/4 कप बर्फाचे पाणी

**कृती -**

- मोठ्या मिक्सिंग वाडग्यात, मैदा आणि मीठ एकत्र करा.
- पिठाच्या मिश्रणात थंड बटरचे चौकोनी तुकडे घाला.
- पेस्ट्री कटर किंवा तुमच्या बोटांच्या टोकांचा वापर करून, लोणीचे मिश्रण मटारच्या आकाराच्या लोणीच्या तुकड्यांसारखे खडबडीत तुकड्यांसारखे होईपर्यंत पीठात लोणी घाला.
- हळूहळू बर्फाचे पाणी, एका वेळी एक चमचे, एक काटा मिसळून पीठ एकत्र येईपर्यंत घाला.
- एकदा पीठ एकत्र जमायला लागलं की, हाताने बॉलमध्ये मळून घ्या. जर पीठ खूप कोरडे असेल तर थोडे अधिक बर्फाचे पाणी घाला, एका वेळी एक चमचे.
- पिठाचे दोन समान गोळे करा, प्रत्येक चकतीमध्ये सपाट करा, प्लास्टिकच्या आवरणात गुंडाळा आणि किमान 30 मिनिटे थंड करा.

**पेस्ट्री रोल**

- तुमचे ओव्हन 375°F (190°C) वर गरम करा.
- रेफ्रिजरेटरमधून पीठाची एक डिस्क काढा आणि थोडा मऊ होण्यासाठी सुमारे 5-10 मिनिटे खोलीच्या तपमानावर बसू द्या.
- हलक्या पिठलेल्या पृष्ठभागावर, पीठ सुमारे 1/8 इंच जाडीच्या वर्तुळात गुंडाळा, पीठ अधूनमधून फिरवा आणि चिकट होऊ नये म्हणून आवश्यकतेनुसार कामाच्या पृष्ठभागावर किंवा रोलिंग पिनवर अधिक पीठ घाला.
- गुंडाळलेले पीठ काळजीपूर्वक 9-इंच पाई डिशमध्ये स्थानांतरित करा.

**पाई डिशमध्ये आपले इच्छित फिलिंग जोडा**

- पिठाची दुसरी चकती पहिल्या प्रमाणेच गुंडाळा.
- ते फिलिंगवर ठेवा.
- सुमारे 1-इंच ओव्हरहँग सोडून, कडा पासून कोणतेही जास्तीचे पीठ ट्रिम करा.
- सील करण्यासाठी वरच्या आणि खालच्या क्रस्ट्सच्या कडा एकत्र दाबा, नंतर इच्छेनुसार कुरकुरीत करा.

**पेस्ट्री बेक करा:**

- तुमच्या रेसिपीमध्ये प्री-बेक्ड क्रस्टची आवश्यकता असल्यास, कवचाच्या तळाला काट्याने टोचून घ्या, चर्मपत्र कागदाने रेषा करा आणि पाई वेट्स किंवा वाळलेल्या बीन्सने भरा.
- प्रीहेटेड ओव्हनमध्ये 10-15 मिनिटे बेक करावे, किंवा कवच सेट होईपर्यंत आणि फक्त सोनेरी होण्यास सुरुवात होईपर्यंत.
- जर तुमच्या रेसिपीमध्ये भरलेल्या आणि न बेक केलेल्या पाईची आवश्यकता असेल, तर तुम्ही वापरत असलेल्या विशिष्ट फिलिंगसाठी बेकिंग सूचनांचे अनुसरण करा.

**सर्व्ह करा:**

- एकदा भाजल्यावर, सर्व्ह करण्यापूर्वी पेस्ट्रीला किंचित थंड होऊ द्या.



## समाजभान



श्री धनंजय शेटये.
गोळवण, ता.मालवण
मोबाईल.
९६१९२२२७०९

# कोचिंग क्लासेस आणि निर्बंध!!.’

नव्वदी दशकात खासगी क्लासेस खासगी शिकवणी ही फक्त शैक्षणिक मागासलेपण दूर करण्यासाठी असायचे. गुण कमी मिळणा-या अभ्यासात मागे राहणा-या विद्यार्थ्यांना जास्तीचा वेळ देऊन त्यांची सारखी सारखी उजळणी करुन घेतली जायची.अशा विद्यार्थ्यांचे ध्येय फक्त उत्तीर्ण होणं एवढेच असायचे.शाळेचे शिक्षक अशा कमकुवत विद्यार्थ्यांना शाळेतच थांबवून अभ्यास करून घेत असत तर कधी संध्याकाळी शिक्षकांच्या घरी पाठवले जायचे. त्याकाळात क्लासेस लावणे म्हणजे कमीपणाचे वाटायचे.पण नंतरच्या दशकात काही खासगी क्लासेसनी व्यावसायिक चेहरा धारण करून शैक्षणिक क्षेत्रात पाऊल टाकले.गुणवत्तेची नव्वदी पार करणारे गुणपत्रक जाहिरातीतून झळकू लागले.सहाजिकच पालक वर्ग भपकेबाज गुणवत्तेचं आमिष पाहुन आपल्या पाल्याला खासगी क्लासेसला पाठवायला लागले.मग काय क्लासेसवाले वर्तमानपत्रात दररोज संपूर्ण पानच्या पानं जाहिरातीने भरू लागले.गुणवत्ता धारण केलेल्या विद्यार्थ्यांची छायाचित्रे वर्तमानपत्रात झळकलेली पाहुन पालक आपल्या मुलांचे गुणवत्तेचं भवितव्य क्लासेसच्या वादळात आजमावण्यासाठी प्रयत्न करु लागले. एका नामांकित इंजिनिअर व्यक्तीने आपला पेशा सोडून खासगी क्लासेस सुरु करुन महाराष्ट्रात खासगी क्लासेसचं वादळ निर्माण केले.महाराष्ट्रात जवळजवळ सर्वच जिल्ह्यांत क्लासेसच्या शाखा निर्माण केल्या. मुंबई शहरात पूर्व पश्चिम अशा प्रत्येक भागात दोन दोन शाखा निर्माण करुन अक्षरशः मुंबईसह महाराष्ट्रात क्लासेसचे घोंघावते वादळ निर्माण झाले. त्याकाळी क्लासेसला ॲडमिशन घेताना वशिला लागायचा. मग सहाजिकपणे फी मध्ये भरमसाठ वाढ करण्यात आली. मार्केटमध्ये अनेक क्लास नव्याने नावारूपाला येऊ लागले.जास्त फी असेल तो चांगला क्लास असे समिकरण पालकांची विचारसरणी ग्रहण करु लागले.शिक्षणाचे बाजारीकरण झाले.भपकेबाज गुणवत्तेच्या जाहिराती पालकांना आकर्षित करुन घेण्यात यशस्वी ठरु लागल्या.नववी दहावीची दोन वर्षांची एका विद्यार्थ्याची फी लाखांचा टप्पा पार करुन गेली.पालकही बिनदिक्कतपणे आपल्या मुलांच्या गुणवत्तेसाठी लाखोंनी पैसा क्लासेसमध्ये ओतू लागले.

क्लासेसचे फॅड निर्माण झाले. आजच्या घडीला सर्वच शाळेच्या विद्यार्थ्यांपैकी नव्वद टक्के विद्यार्थी कुठल्या ना कुठल्या क्लासेसमध्ये जाऊ लागले.शालेय विद्यार्थी क्लासेल न जाणे म्हणजे त्या विद्यार्थ्यांना कमीपणाचं वाटू लागले.गल्लोगल्ली दरवर्षी हजारो क्लासेस उदयास येऊ लागले. क्लासेस वाल्यांची स्पर्धा सूरू झाली.गुणवत्ता ही काही जादू नसते. प्रचंड मेहनतीशिवाय,कठोर प्रयत्नाशिवाय गुणवत्ता प्राप्त करता येत नसते.पण क्लासेसवाले गुणवत्तेची हमखास हमी देऊन पैसे उकळू लागले मग पालक पैसे टाकून गुणवत्ता खरेदी करण्याची स्वप्ने पाहु लागले.इथुनच ख-या गुणवत्तेचा शेवट झाला. भ्रष्ट मार्गाने गुणवत्ता मिळवण्यासाठी पेपर फुटीची प्रकरणे निर्माण होऊ लागली. शिक्षकांचा स्वाभिमान पैशात विकला जाऊ लागला. खासगी क्लासेसवाल्यानी गैरमार्गाने फेकलेल्या पैशामुळे शैक्षणिक क्षेत्र काही प्रमाणात कलंकित होऊ लागले. शाळेचे शिक्षकही खासगी क्लासेस सुरु करु लागले. क्लासेस येणा-या मुलांना गुणवत्तेचं झुकतं माप मिळू लागले. भ्रष्टाचाराची चीड फोफावत चालली. विद्यार्थ्यांना फक्त परीक्षेसाठी अभ्यास करायचा असतो अशीच मनाची धारणा होऊ लागली. विद्यार्थी फक्त परीक्षार्थी बनले.आज ज्युनिअर केजीच्या विद्यार्थ्यांनाही पालक क्लासला पाठवू लागले आहेत हे पाहून या वेडसर पणाला काय म्हणावे?? असेच वाटत राहते.बालकांचे बालपण हिरावून घेऊन क्लासमध्ये पाठवणे हे खरं तर चूकीचे आहे.आपल्या पाल्यांचे थोड्याशा एक दोन टक्क्यांनी गुण कमी झाले तरी पालकांचा होणारा त्रागा पाहुन विद्यार्थ्यांचे मानसिक खच्चीकरण होत गेले.मग काही आत्महत्येचा मार्ग शोधू लागले. केंद्र सरकारने खासगी क्लासेस संदर्भात घेतलेल्या निर्णयांचे कौतुक करायला हवं.१६ वर्षांपर्यंत कशाला हवेत क्लासेस? त्यांना त्यांचे बालपण मुक्तपणे जगू द्या. त्यांचा सर्वांगीण विकास होऊ द्या. त्या विद्यार्थ्यांना फक्त पुस्तकी किडे बनवू नका.त्यांना फक्त परीक्षार्थी बनवू नका त्यांना विद्यार्थी बनू द्या. अभ्यासाचे ओझे वाटू नये.

Home Tutions खासगी शिकवणी व कोचिंग क्लासेस हे दोन वेगवेगळे विषय आहेत. तसेच ग्रुप ट्युशन्स ही आणखी एक संकल्पना आहे. कोचिंग क्लासेस शासनमान्य नोंदणीकृत असेल तर वरील निकष,अटी लादल्या जाऊ शकतात. परंतु गल्लोगल्लीतील क्लासेस ग्रुप ट्युशन्स नावाने शिकवणी सुरु ठेवतील. ग्रुप ट्युशन्सला शासनाची बंधने लादता येणे अवघड आहे. पण काही क्लासेस नामांकित आहेत भरमसाठ सुखसुविधा उपलब्ध आहेत त्यामुळे असे पैशात खेळणारे क्लास फी सुद्धा भरमसाठ आकारणी करतात. गुणवत्तेची आमिष दाखवून पूर्तता करत नाहीत.त्यामुळे अशा क्लासेसना कुठे तरी चाप लावणे गरजेचे असते.

दैनिक
सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम

# बालमैफिल

## बालकांसाठी शालेय मुलांनी तयार केलेले वर्तमानपत्र
## “आजचं पत्र- उद्याच्या समृद्धीसाठी!”

*दैनिक सिंधुदुर्ग समाचारने कोकणातील मुलांना या उन्हाळी सुट्टीमध्ये लिहीत होण्यासाठी एक नवीन उपक्रम हाती घेतला आहे . यामध्ये कोकणातील विविध शाळांतील मुलांनी केलेले लिखाण प्रसिद्ध होणार आहे.*
*प्रामुख्याने या "बालमैफिल" च्या पुरवणीची सर्व जबाबदारी दापोली तालुक्यातील चंद्रनगर येथील शाळेच्या विद्यार्थ्यांनी घेतली आहे. यामध्ये मुलांना लिखाण करण्यासाठी मुलांना प्रोत्साहित करण्यापासून ते पुरवणीची सर्व जबाबदारी या शालेय विद्यार्थ्यांनी घेतली आहे. या उपक्रमासाठी मुलांनी दिलेला होकार आणि भरघोस प्रतिसाद अवर्णनीय आहे . या सर्वांना मार्गदर्शन प्रथितयश लेखक आणि शिक्षक बाबू घाडीगावकर सर करत आहेत .*


**बाल अतिथी संपादक- कु. पुर्वा जगदाळे**



**संपादन सहायक- कु. वैष्णवी आंबेलकर**



**सहसंपादक- कु. वेदिका मुलूख**



**मांडणी व सजावट- कु. शमिका मुलूख.**



**इतर सहाय्य- कु. इशांत पागडे**



# विशेष संपादकीय

## लिहीते होऊया!

खरेतर एखाद्या पुरवणीचं संपादन करण्याची जबाबदारी पहिल्यांदाच आम्ही खांद्यावर घेतली आहे. आमचा पहिला प्रयत्नही अगदी सुरेख जमल्याचे समाधान आज माझ्या चेहर्‍यावर आहे. आम्ही मुले तर दरवर्षी मे महिन्याची सुट्टीसाठीच वाट बघत असतो. या सुट्टीत फक्त मज्जा आणि मज्जाच हवी असते. मग ते निबंध लिहा, त्यासाठी वाचन करा, संपादकांचा लेख लिहा, कविता लिहा वगैरेंसारख्या गोष्टी आतापर्यंत नको वाटायच्या. खेळा, हुंदडा, आंबे, गरे खा वगैरे छान वाटायचं. पण घाडीगांवकर सरांनी आधीच सांगितलं की, तुम्हाला पुरवणी संभाळायची म्हणजे वेगळं असं काही करायचं नाहीय. तुम्ही जे काही हुंदडाल ते हुंदडायचंच आहे. आंबे, गरे खायचेच आहेत. मात्र जे जे काही कराल ते अगदी थोडक्यात कागदावर लिहायचं, मोबाईलवर टाईप करायचं आणि पुढे पाठवायचं आहे. सरांच्या म्हणण्यानुसार आता आम्ही काम सुरु केलं आहे. आम्हाला जे जे काही सुचतं ते आम्ही आधी आठवणीसाठी वहीत एक दोन ओळीत लिहून ठेवतो आणि मग त्यावर सविस्तर लिहीत जातो.


दरवर्षी खरं पाहता आम्ही मुलं हे सारं करतो. फिरतो, मामाकडे जातो. आंबे खातो, गरे खातो. समुद्रावर जातो, एखाद्या रिसॉर्टला जातो. मात्र आम्ही सुट्टीत अशा प्रकारे जी मौजमजा करतो ती कागदावर उतरवण्याची सवय आता यापुढे देखील आम्हाला लागणार आहे हे याच जबाबदारीचं फलित म्हणावं लागेल. माझ्या वेदीका, वैष्णवी, दिया, शमिकासारख्या मैत्रिणी मला हे सारं संपादन करण्याच्या कामात मोलाची मदत करीत आहेत. इशांतही छान छान कविता लिहून पाठवित असतो. यावर्षी एक वेगळा अनुभव, वेगळी संधी दिल्याबद्दल मी व्यक्तिशः सिंधुदुर्ग समाचारची ऋणी आहे.

अनेकदा मनात खूप काही सुचत असतं. अनेकदा अनेक विषयांवर लिहावसं वाटतं. पण मग आळस येतो, कंटाळा वाटतो. मात्र यंदा आळस, कंटाळा झटकून अनेक विषयांवर लिहीणं होत आहे. या निमित्ताने सुट्टी असली तरी वाचन घडत आहे, पर्यायाने सुट्टीतही अभ्यासापासून दूर गेली नाही याचं माझ्या आईबाबांना कौतुक वाटतं. आम्ही लहान मुलं जे काही लिहीतो त्याचं खरोखरच सर्वांना कौतुक वाटतं. आजीआजोबांना, काका-काकीला, मामा-मामीला, अगदी सगळ्यांनाच. आमचे निबंध, कविता वाचून, चित्र पाहून सगळीजणं आमचं कौतुक करतात. हे सारं सिंधुदुर्ग समाचार मुळे घडून येत आहे. नाहीतर आमच्या हातून असं लिहीण्याची संधी आम्हाला कोणी दिली असती?

आता आम्हाला या पुरवणीच्या निमित्ताने नियमित लेखन करण्याचा जणु छंद जडला आहे. आम्हाला आता नवे नवे विषय सुचत आहेत, शब्द सुचत आहेत. नवे काही तरी लिहीण्याची उर्मी जागृत होत आहे. मात्र आमच्या पुरवणीबाबत अधिकाधिक वाचकांनी आपले अभिप्राय कळवावेत अशी एक अपेक्षा याठिकाणी व्यक्त करावीशी वाटते. काही चुकलं तर आमचे कान ओढा.(माझे कान मुळातच लांब आहेत.)पण आमच्या या प्रयत्नांबद्दल काही न काही अवश्य कळवा. शेवटी तुमचे वाचकांचे अभिप्राय आम्हाला नवी उर्जा देणार आहेत. आमच्या लेखणीला अधिक बळ देणार आहेत. तुमचे थोरामोठ्यांचे आशीर्वाद हेच आमचं प्रेरणास्थान आहे.

**कु. पुर्वा सचिन जगदाळे**





# सुट्टीचा आनंद


दोन कारणांमुळे मला ना सुट्टी अतिशय आवडते. एक म्हणजे त्या दिवसात आंबे मिळतात. दुसरे कारण म्हणजे शाळेला सुट्टी असते. दीड महिना शाळा, अभ्यास, गृहपाठ सर्व बंद. हे दोन महिने मस्त वाटतात. केवळ मौज मस्ती असते. या सुट्टीत मी माझ्या मामा-मामीकडे राहायला जाणार आहे. माझे मामा -मामी दापोलीजवळच्या एका छोट्याशा गावात राहतात. मी माझ्या आई-बाबांसोबत तिथे जाईन. मी आणि माझी बहीण तिथे खूप मस्ती करू.

मामाच्या घराभोवती अनेक प्रकारची झाडे आहेत. चिकू ,नारळ ,आंबा ,अशी अनेक झाडे आहेत. आम्ही मुले तिथे खूप मजा करतो. अनेक प्रकारचे खेळ खेळतो. दुपारी उन्हात जायचं नसते म्हणून आम्ही पत्ते, कॅरम, असे बैठे खेळ खेळतो. मी तिथे खूप फळे व वेगवेगळ्या ताज्या भाज्या खाईन. संध्याकाळी मी मामा सोबत फिरायला जाईन.

एक दिवस आम्ही संध्याकाळी सर्व मिळून रानात जाऊन तिथे आम्ही खूप आंबे खाऊ आणि खूप आम्ही घरी आल्यावर खायला आणू. मी आंब्यांसोबत करवंद ,आवळा, काजू असे अनेक फळे घेऊन येईन. सुट्टी असली तरी मी थोडा वेळ तरी अभ्यासाला करायला बसेन. उन्हाळी सुट्टीत मी खूप मज्जा करेन. मला ना सुट्टी खूप आवडते!

**कु. वैष्णवी वसंत आंबेलकर**





# वेदीका मुलूख हिची आदर्श विद्यार्थिनी म्हणून निवड

**दापोली-** दापोली तालुक्यातील चंद्रनगर येथील शिक्षण कला क्रीडा संस्थेने आयोजित केलेल्या वार्षिक सर्वसाधारण समारंभात चंद्रनगर गावातील विद्यार्थ्यांसाठीचे विविध पुरस्कार जाहीर केले असून याच कार्यक्रमात विद्यार्थ्यांना पुरस्कार वितरित करून गौरविण्यात आले. चंद्रनगर शाळेतील इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी कु. वेदिका सुभाष मुलूख हिला आदर्श विद्यार्थी पुरस्कार प्राप्त झाला असून तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

चंद्रनगर येथील शिक्षण कला क्रीडा ही संस्था दरवर्षी मे महिन्यात वार्षिक समारंभाच्या निमित्ताने बालक-पालक-शिक्षक आनंद मेळाव्याचे आयोजन करते. यानिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचेही आयोजन करण्यात येते. यावर्षी संस्थेने चंद्रनगर शाळेतील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, वक्तृत्व, निबंध, स्मरणशक्ती, संगीत खुर्ची यांसारख्या स्पर्धांचे आयोजन केले होते. स्पर्धेतील सर्व विजेत्या विद्यार्थ्यांना संस्थेकडून मान्यवरांच्या हस्ते आकर्षक व शालोपयोगी बक्षिसे देण्यात आली. याशिवाय शाळेतील आदर्श विद्यार्थी म्हणून कु. वेदिका सुभाष मुलूख, गुणवंत विद्यार्थी म्हणून कु. पुर्वा सचिन जगदाळे तर गरीब व होतकरु विद्यार्थी म्हणून कु. वैष्णवी वसंत आंबेलकर या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. सर्वांना मान्यवर व्यक्तिंच्या हस्ते गौरविण्यात आले. या पुरस्कार वितरण समारंभासाठी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष सदानंद मुलूख, उपाध्यक्ष शैलेश मुलूख, सचिव स्वरुप मुलूख, सल्लागार विजय मुलूख, सुनील रांगले,चंद्रनगर गावच्या सरपंच भाग्यश्री जगदाळे, रत्नागिरी जिल्हा परिषद नियोजन समितीचे सदस्य मोहन मुळे, मुख्याध्यापिका अर्चना सावंत, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रुपेश बैकर आदी मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार वितरण समारंभाचे सूत्रसंचालन स्वरुप मुलूख यांनी केले तर रुपेश बैकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.



**वेदीका मुलूख**



**कु. वैष्णवी आंबेलकर**




**कु. पुर्वा जगदाळे**





# माझ्या मामाचा गाव



कु. दिया अरुण मुलूख

माझ्या मामाचा गाव वणंद. तो दापोली तालुक्यात आहे. माझी आजी, आजोबा मे महिन्याच्या सुट्टीत माझी तर वाटच बघत असते. मलाही मामाचा गाव खूप आवडतो. कधी सुट्टी लागते आणि मी मामाकडे जाते असे मला होते. माझ्या मामाचा गाव म्हणजे नारळी पोफळींच्या गर्दीत लपलेले एक सुंदर खेडे आहे. गावातून एक नदी वाहते. या नदीचे पाणी कधीच संपत नाही. गावातील लोकांना या नदीचा खूप उपयोग होतो.



माझा मामा, मामी, आजोबा, आजी खूप प्रेमळ आहेत. मी तिकडे गेली की त्या सर्व लोकांना खूप आनंद होतो. माझी आजी माझे खूप लाड करते. कधी कधी मी फार बडबड करते म्हणून मला ओरडते. माझ्या मामाकडे मांजरं खूप आहेत. मामाला मांजरं पाळायला आवडतं. मलाही मांजरं आवडतात. मला मांजरांबरोबर खेळायला आवडतं. मी मामाकडे गेल्यावर. खूप फिरते. मी तिथल्या मुलींशी खेळते. आम्ही तिकडे लपाछपी, लगोरी, पकडापकडी खेळतो. माझी मामी चिकन-भाकरी छान बनवते. मला तिच्या हातचे सगळेच जेवण आवडते.

मी दरवर्षी मामाकडे जाते. अन मला तिकडे जाण्याचा कधीच कंटाळा येत नाही. माझ्याही तिकडच्या लोकांना कधी कंटाळा येत नाही. मला माझ्या मामाचा गाव फार आवडतो. असा आहे माझ्या मामाचा गाव.



# सुट्टीचा सदुपयोग



कु. पुर्वा सचिन जगदाळे

दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा मला दोन महिने उन्हाळी सुट्टी पडली. मी ही उन्हाळी सुट्टी खूप मजेत .घालवणार आहे. त्याच प्रमाणे मी या उन्हाळी सुट्टीचा चांगला सदुपयोग करणार आहे . आता सुट्टी पडली तर अभ्यासाचा बट्ट्याबोळ. म्हणून मी दररोज शिकवलेल्या अभ्यासाची थोडी-थोडी उजळणी करीत आहे. दररोज उजळणी केल्यामुळे माझा शिकवलेल्या अभ्यास कायमचा लक्षात राहील याची मला खात्री आहे आणि याशिवाय मी या सुट्टीचा दुसरा सदुपयोग करणार आहे. शाळा सुरू असताना दररोज मला घरी आल्यावर शाळेचा अभ्यास करावा लागत असे. मला माझे छंद जोपासण्यासाठी वेळच मिळत नसे. म्हणून मग मी या सुट्टीत माझे अनेक छंद जोपासण्याचे ठरवले आहे..

मला खूप अशा वेगवेगळ्या विषयांवर निबंध आणि चित्र काढायला खूप आवडतात. म्हणून मी या सुट्टीत खूप विषयांवर निबंध लिहायचे ठरवले आणि खूप सारी चित्र काढायचे ठरवले आहे. मला कविता लिहायला पण खूप आवडतात. त्याचप्रमाणे मला इतर कवींनी लिहिलेल्या कविता तालासुरात म्हणायलाही खूप आवडतात. म्हणून मी या उन्हाळी सुट्टीत खूप साऱ्या कविता लिहिल्या व लिहिणार आहे. इतर कवींच्या कविता ही मी ताल लावून गायल्या आहेत. माझ्या उन्हाळी सुट्टीचा सदुपयोग मी असा करत आहे, करणार आहे

असा सदुपयोग केल्यामुळे माझी ही उन्हाळी सुट्टी खूप जाणार आहे. माझा या सुट्टीत अभ्यासही होत आहे . मी या सुट्टीत मज्जाही करत आहे आणि माझे अनेक छंद ही मी जोपासत आहे.

# मे महिन्यात परीक्षा नकोच!



कु. स्नेहा घाडीगांवकर




परीक्षा म्हणजे आम्हा विद्यार्थ्यांच्या एकदम जवळची गोष्ट. जी कधी हवीशी वाटते तर कधी नकोशी. आम्ही मुले तर वयाच्या पाचव्या वर्षापासून शाळेत जातो. तेव्हापासून अभ्यास आणि परीक्षा आमची पाठ सोडतच नाही. त्यामुळे परीक्षा नसत्या तर हा विचार येताच मनात गोड गुदगुल्या होतात. खरोखरच हा परीक्षेचा बागुलबुवा आम्हा मुलांच्या मागे नाही लागला तर आमचं जीवन किती सुसह्य होइल. पण परीक्षा नसत्या तर आमच्या ज्ञानाची कसोटी कशी लागणार? आम्ही वर्षभर जे शिकलो त्याची पडताळणी कशी होणार? म्हणून परीक्षा ह्या महत्वाच्या आहेत. पण ह्या परीक्षा जर मे महिन्यात आल्या तर ..... मे महिना म्हटलं तर सर्वाच्या मनात ते सुट्टीचे दिवस, मस्त आंबे, गावचे घर, तिथली मज्जा, सहली, मैत्रिणीसोबत फिरायला जाणं, घरच्याबरोबर वेळ घालवणं आणि खूप काही. पण जर परीक्षाच मे महिन्यात सुरू झाल्या तर...? बापरे! मे महिन्यातील हया सगळ्या मज्जेचा त्याग करावा लागतो. त्यात मे महिना म्हणजे उन्हळा, एवढ्या गरमी मध्ये अभ्यास करणं अशक्य होते. पण तरीही उत्तम मार्क्स मिळवण्यासाठी अभ्यास करावाच लागतो. पाण्याचा तुटवडा तर आहेच. घरापासून लांब राहणाऱ्या विद्यार्थ्यांना घरची ओढ लागलेली असते. ह्या सगळ्या अडचणींमध्ये अभ्यास तर चांगला होणार नाही. म्हणूनच परीक्षा ह्या मे महिन्यात नसाव्यात.

# जर मे महिन्याची सुट्टी नसती तर....

मे महिना सुरू झाला की सर्व मुलं खूपच खुश असतात. कारण सर्व शाळाना सुट्टी पडते. मे महिन्यात कोण आजोळी जातात, कोण मुंबईला जातो. दिवसभर निस्त्या उनाडक्या. मे महिन्यात सगळ्यांचा आवडता, पण नेमकं विहिरीतलं पाणी आटून जातं. खूप उकाडा असतो. पण जर मे महिन्याची सुट्टीच नसती तर ? तर आपण शाळेत जाऊन कंटाळलो असतो. आपल्याला मन मोकळेपणाने हिंडता फिरता आलं पाहिजे. मे महिन्याच्या सुट्टीत सर्व खूप फिरतात.

या महिन्यात खूप मजा येते. जर मे महिन्याची सुट्टीच नसती तर आपल्याला पुढच्या वर्गाचा अभ्यास आलाच नसता. मे महिन्यात सुट्टी नसती तर आंबे कसे जमू शकलो असतो? पण जर मे महिन्याची सुट्टीच नाही पडली तर! मला मे महिन्याची सुट्टी खूप आवडते.

कु. वेदिका सुभाष मुलूख



## चल रे दादा

चल रे दादा आंब्याच्या बुंधाशी
चल रे दादा चल.....

आंबा घोसांनी धरला रे
तो बघ पिकाया लागला रे
एक खडा घेऊ, घोसावर मारू
आंबे टिपाया चल......


गोड गोड चवीला आंबा रे
रसाळ मधाळ लागतो रे
आंबे गोळा करू, घरामध्ये नेऊ
टोपली घेऊन तू चल......

शाळेला सुट्टी पडली रे
मित्रांशी गट्टी जमली रे
पोरं पोरं जमू, आंब्याखाली जाऊ
पोरांना घेऊनी चल.....

टपकन आंबा पडला रे
देवाला पावन झाला रे
देवापुढे ठेवू, सारंजण खाऊ
आंब्याखाली तू चल....

आंब्याचे नाव मोठे रे
त्रिखंडात ते गाजते रे
बिगी बिगी जाऊ, आंबे गोळा करू
जमविण्या तू चल....


कु. इशांत राजेंद्र पागडे













## मे महिना नसता तर....

आम्ही तर दरवर्षी मे महिन्याची वाट बघत असतो. कधी एकदाचा मे महिना येतो आणि आमची मजा होते असं आम्हाला झालेलं असतं. पण कधी कधी डोक्यात विचार येतो की हा मे महिना नसता तर? मे महिना नसता तर आम्हा मुलांचे भरपूर वांदे झाले असते. वर्षभर नुसता अभ्यासच करावा लागला असता. सतत परीक्षा द्याव्या लागल्या असत्या. या वयात अभ्यासाबरोबरच खेळही खेळायला हवेत. पण मे महिना नसता तर कसे खेळ खेळता आले असते? कसे आंबे टीपता आले असते? कसे फणस खाता आले असते? सतत अभ्यास करून करून नुसता वैताग आला असता. कोणाच्या लग्नाला जाता आलं नसतं. कुठे पुजेला जाता आलं नसतं. पुजेला डान्सही करता आले नसते. मामाकडे जाऊन मजा करता आली नसती. खरोखरच मे महिना नसता तर आमच्यासारख्या मुलांचे फार हाल झाले असते. देवाबाबा बरं केलंस की मे महिना सुरु केलास. नाहीतर आम्हा मुलांचं काही खरं नव्हतं. मला तरी असं वाटतं. आणखी कोणाला काय काय वाटतं काय माहीत?

**कु. आरोही महेश मुलूख**



## गाव माझा मस्त!

दरवर्षी मे महिन्यात आम्ही गावी जातो. वाडीच्या अगदी टोकाला आमचे घर आहे. मे महिन्यात आमच्या घरात भरपूर माणसं असतात. बरीचशी मुंबईतून आलेली असतात. घरामागे एक जुना गोठा आहे. त्या गोठ्यात सतुकाका बैल, म्हशीला बांधतो. सतुकाकाची म्हस दररोज दोन तांबे भरून दूध देते. तो दूध काढत असताना मला सोबत घेऊन जातो. सतुकाकासोबत मी बैलांना पाणी पाजण्यासाठी तळ्यावर घेऊन जातो. सतुकाकाची म्हस एकदा तळ्यात शिरली की भरपूर वेळ बाहेर येत नाही. गावाकडचे तळे मस्त आहे. आमच्या घरापासून जवळच आहे. त्यात भरपूर पाणी आहे. तळ्याजवळ महापुरुषाचा पार आहे. दररोज संध्याकाळी खूप माणसे तिथे गप्पागोष्टी करत बसतात. दरवर्षी मे महिन्यात तिथे गावाची पूजा असते. पूजेदिवशी व रात्री भरपूर कार्यक्रम असतात. मला दशावतारी नाटक फार आवडते. घराजवळच्या परड्यात जांभळाची भरपूर झाडं आहेत. आंबेही भरपूर आहेत. पिकलेले आंबे दगड मारून पाडायला मजा येते. सगळेच आंबे गोड गोड आहेत. तिथे चारोळीचीही झाडं आहेत. चारोळीची फळंही गोड गोड लागतात. गावी फार मजा येते. तिथं आणखी आणखी रहावेसं वाटतं. अभ्यासाचा त्रास नाही. फक्त मजाज मजा. मला गाव खुप आवडतो.



**कु. सोहम घाडीगांवकर**

## कलांगण



**कु. शमिका नयनेश मुलूख**





**कु. पुर्वा सचिन जगदाळे**







**कविषा सातारकर**
**Std 6th**
**गोवा**

## ५ सेकंदात ३ फरक ओळखा



